# प्रकरण चार

## महिला व बालकल्याण विभाग

**4.588 घरघंटी पुरविणे योजना राबविणेबाबत.**

**पंचायत समिती जव्हार, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती, जव्हारचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना एकात्मिक बालविकास व महिला बालकल्याण विभागांतर्गत घरघंटी पुरविणे योजना राबविण्यात आली असून त्यावर एकूण रक्कम रूपये 4,75,013/- एवढा खर्च प्रकल्प-1 व 2 अंतर्गत नोंदविण्यात आला आहे. सदरील योजने अंतर्गत लाभार्थींना लाभ देण्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभ दिलेल्या लाभार्थींचे निवडीचे निकष लेखापरीक्षणास पहावयास मिळाले नाही.

2) निवड झालेल्या लाभार्थांचे प्रस्ताव व त्यावरील शिफारस पहावयास मिळाले नाही.

3) लाभ दिलेल्या लाभार्थांकडील लाभ मिळाल्याबाबतचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला उपलब्ध झाला नाही.

4) लाभ दिलेल्या लाभार्थांबाबत लाभ नोंदवही मास्टर रजिस्टर उपलब्ध झाले नाही.

5) सदरील योजनेत प्रकल्प-1 लाभार्थी 16 व प्रकल्प-2 लाभार्थी 15 आहेत. याबाबत मागणी, वाटप आदेश, पोहोच उपलब्ध झाले नाही.

**4.589 किशोरवयीन मुली व महिलांना जीवन कौशल्य प्रशिक्षण देणे योजनेबाबत.**

**पंचायत समिती डहाणु, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, डहाणू यांचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी महिला बालकल्याण विभागाने किशोरवयीन मुली व महिलांना जीवन कौशल्य प्रशिक्षण देणे योजनेवर प्रमाणक क्रमांक 51, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 42,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) किशोरवयीन मुली व महिलांना जीवन कौशल्य प्रशिक्षण देणे योजनेची नस्ती तपासली असता विभागाने त्यांच्या उपकेंद्रावर प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले आहे. योजनेच्या उद्देश्यानुसार किशोरवयीन मुली व महिलांना जीवन कौशल्याचे प्रशिक्षण तज्ञ व्यक्ती उदा. वैद्यकीय अधिकारी, स्त्री रोग तज्ञ, मनोवैज्ञानिक, तज्ञ अंगणवाडी सेविका इत्यादी यांना प्रशिक्षणासाठी बोलावणे आवश्यक होते. तथापि, सर्व उपकेंद्रातील प्रशिक्षणासाठी तेथील मुख्य सेविका यांना मार्गदर्शन केलेबाबत मानधनाची रक्कम अदा केली आहे. ज्या मुख्य सेविका यांना मानधनाची रक्कम अदा केली आहे, त्या मुख्य सेविका त्या त्या उपकेंद्रात नियमित वेतनी कर्मचारी म्हणून काम करतात. किशोरवयीन मुली व महिलांना जीवन कौशल्याचे मार्गदर्शन करणे हे त्यांचे नियमित काम असताना अतिरिक्त दिलेले मानधन लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. तरी रक्कम रूपये 42,000/- संबधितांकडून वसूल करून पूर्तता करावी.

2) किशोरवयीन मुली व महिलांना जीवन कौशल्य प्रशिक्षणाचे आयोजन केलेबाबत उपकेंद्रातील प्रशिक्षण सत्राचे फोटो लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

**4.590 किशोर वयाचे मुलींना व महिलांना जीवन कौशल्य प्रशिक्षण योजनामधील अनियमितताबाबत**

**पंचायत समिती तलासरी, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती तलासरी अंतर्गत एकात्मिक बालविकास प्रकल्प, तलासरी ह्यांनी किशोर वयाचे मुलींना व महिलांना जीवन कौशल्य प्रशिक्षण योजने अंतर्गत 8 विषयावर प्रशिक्षणाबाबत मार्गदर्शन करावयाचे आहे. तसेच यासाठी विद्यार्थ्यांचे किमान वय प्रपत्र अ नुसार 11 ते 18 वर्ष असणे आवश्यक आहे. तसेच प्रशिक्षणासाठी मार्गदर्शक म्हणून विषयानुसार वैद्यकिय अधिकारी, स्त्रीरोग तज्ञ, विधी तज्ञ, अनुभवी व संवेदनशील तज्ञ व अंगणवाडी पर्यवेक्षिका ह्यांनी मार्गदर्शन करावयाचे आहे. सदरबाबत प्रमाणक क्रमांक 34, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 26,200/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरचे प्रशिक्षण फक्त विद्यार्थीनी पुरतेच मर्यादित घेतलेले असल्याने ग्रामीण भागातील स्त्रीयांना ह्या प्रशिक्षणाचा लाभ देण्यात न आल्याने योजनेचे फलश्रुती पूर्तता झालेली नाही.

2) जीवन कौशल्य प्रशिक्षण योजने अंतर्गत लैंगिक छळ व त्यापासून संरक्षण लहान बालक / मुलींना हिंसाचारापासून वाचविणेसाठी घ्यावयाची काळजी /उपाय योजनेसाठी तज्ञ म्हणून विधी तज्ञ यांना प्रशिक्षणाकरीता मार्गदर्शक प्रपत्र अ नुसार बोलविणे गरजेचे असतांना सदर अत्यंत गंभीर व महत्वाच्या विषयावर अंगणवाडी पर्यवेक्षिकांनी प्रशिक्षण मार्गदर्शन केलेले असल्याने प्रशिक्षणाचे मूळ उद्दीष्ठ सफल झालेले नाही. त्यामुळे झालेला खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3) प्रशिक्षणाकरीता अंगणवाडी पर्यवेक्षिकांनी मार्गदर्शन केलेले आहे. त्याकरीता त्यांना रूपये 11,200/-

प्रशिक्षण शुल्क अदा केलेली आहे. अंगणवाडी पर्यवेक्षक हे जिल्हा परिषद कर्मचारी आहेत व त्यांच्या दैंनदिन सेवा काळात (duty period) मध्येच सदर प्रशिक्षण दिलेले असल्याने त्यांना प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण शुल्क अदायगी केलेली रक्कम लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. तरी संबंधितांकडून रक्कम रूपये 11,200/- वसूल करुन जिल्हा परिषद सेस फंडात जमा करुन पूर्तता दर्शवावी.

**4.591 पंचायत समिती सेस अंतर्गत 90 टक्के अनुदानावर पिकोफॉल मशीन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती खालापूर, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत रक्कम रुपये 5,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाने ई-निविदा मागवून सर्वात कमी दराची निविदा श्री.व्यंकटेश इंटरप्रायजेस यांना पुरवठा आदेश दिलेले आहेत. 76 नग पिको फॉल मशीन प्रती नग रूपये 7,200/- प्रमाणे खरेदी केलेले आहे. मात्र, महिला बालकल्याण विभागाने 76 लाभार्थी यांचेकडून 10 टक्के लाभार्थी हिस्स्याची रक्कम रूपये 54,720/- वसूल केलेली नाही. ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर-1633/57, दिनांक 19/01/1985 अन्वये लाभार्थी हिस्सा पुरवठा आदेश देण्यापुर्वी वसूल करणे आवश्यक आहे. लाभार्थी हिस्स्याची रक्कम रुपये 54,720/- वसूल न करण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) पिको फॉल मशीन वाटप करण्यासाठी 76 मशीन खरेदी केलेल्या आहेत. मात्र सदर पात्र लाभार्थी यादीस महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/2012/प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये पंचायत समिती सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. 76 पात्र लाभार्थी यादीस मंजूरी घेतल्याचे आढळून आले नाही. याबाबत खुलासा सादर करणे आवश्यक आहे.

3) खरेदी केलेल्या 76 पिको फॉल मशीनचे वाटप संबंधीत लाभार्थी यांना लेखापरिक्षण चालू महिना माहे सप्टेंबर 2017 पर्यंत वाटप केलेले नाही. सदर साहित्य माहे मार्च 2017 मध्ये प्राप्त झालेले असतांना एवढ्या विलंबापर्यंत सदर साहित्य वाटप न करण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्र.क्र.1230/34, दिनांक 01/09/1993 नुसार ज्या आर्थिक वर्षात साहित्य खरेदी केले, त्याच आर्थिक वर्षात वाटप करणे आवश्यक असतांना, शासन निर्णयाचे पालन का केले नाही? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.592 10 टक्के पंचायत समिती सेसमधून महिलांना घरघंटी पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती मंडणगड, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,71,720/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर योजनेसाठी लाभार्थी निवड ठराव क्रमांक 565 दिनांक 18/11/2016 अन्वये करण्यात आलेली आहे. परंतु, लाभार्थींचे अर्ज / प्रस्ताव पाहता जानेवारी 2017 चे दरम्यान सादर केल्याचे दिसून येते. तरी लाभार्थ्यांचे अर्ज व अनुषंगिक लेखे न पाहता लाभार्थी निवड कशी झाली, याबाबत स्वयंस्पष्ट खुलासा करावा.

2) श्रीम.विणा भागणे, श्रीम.प्रतिक्षा चव्हाण, श्रीम.नामगुडे यांचे अर्जासोबत तहसिलदार / दंडाधिकारी यांचेकडील रुपये 50,000/- चे आतील उत्पन्न असलेबाबतचे दाखले जोडले नाहीत.

3) सदर योजनेची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

4) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरीकडील पत्र क्रमांक 643 दिनांक 18/03/2017 चे अट क्रमांक 1 ते 11 मध्ये घरघंटी खरेदीबाबतच्या सूचनांचे पालन केल्याचे दिसून येत नाही. उदाहरणार्थ खरेदी केलेल्या घरघंटीसोबत लाभार्थी व महिला व बालकल्याण विभागाकडील एक कर्मचारी असणे आवश्यक आहे. लाभार्थी हमीपत्र उपलब्ध नाही.

**4.593 पंचायत समिती सेस अंतर्गत अंगणवाडींना लोखंडी कपाट पुरविणेबाबत केलेल्या खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत रक्कम रुपये 98,745/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) खरेदी केलेल्या कपाटाचे पुरवठा केल्याबद्दलचे डिलीव्हरी चलन कार्यनस्ती देयका सोबत नाही. परिणामी पुरवठा आदेशातील अटी शर्तीनुसार पुरवठेदाराने साहित्याचा पुरवठा 15 दिवसात केल्याची लेखापरीक्षणाचे वेळी खात्री करता आलेली नाही.

2) खरेदी प्रक्रीया महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भां.ख.रा/2014/ प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील परिच्छेद 11 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरची खरेदी प्रती वर्षी 15 फेब्रुवारी पर्यंतच करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहिता 1968 मधिल नियम 83(3) नुसार वस्तुचा दर्जा व चाचणी अहवाल संबधितांनी घेणे आवश्यक आहे. तथापि, तो कार्यनस्तीत आढळून आलेला नाही. खरेदी केलेल्या वस्तू योग्य प्रतीच्या असल्याची खात्री होत नाही.

**4.594 जिल्हा निधी अनुदानातून बागलाण 2 अंतर्गत इयत्ता 5 वी ते 12 वी च्या मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण देणेबाबत.**

**पंचायत समिती बागलाण, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** जिल्हा निधी अनुदानातून बागलाण 2 अंतर्गत इयत्ता 5 वी ते 12 वी च्या मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण देणेकरिता रक्कम रूपये 1,48,800/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेचे प्रशासकीय, तांत्रिक मंजुरी आदेश व कार्यारंभ आदेश पाहण्यास मिळाले नाही.

2) पंचायत समिती महिला बालकल्याण विभागाने मास्टर नोंदवही (लाभार्थी) ठेवलेली नसल्याने लाभार्थींना दुबार लाभ दिलेला आहे किंवा कसे, लाभार्थी कुटुंबापैकी कोणीही सदस्य अंगणवाडी सेविका, मदतनीस, शासकीय निमशासकीय कर्मचारी यापैकी नसलेबाबत प्रमाणपत्र घेतलेले नाही. तसेच लाभार्थी कुटुंबाने गेल्या 10 वर्षात जिल्हा परीषद / पंचायत समिती महिला बालकल्याण योजनेअंतर्गत वैयक्तीक योजनेचा लाभ घेतला नसलेचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

3) प्रशिक्षण सुरु असतांना प्रत्येक आठवडयात किमान एकदातरी बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रशिक्षण वर्गास भेट द्यावयाची आहे. तसेच कागदपत्रे / व्हीजिट / शेरे बूक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही व तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परीषद, नाशिक आदेश क्रमांक मबाक./अर्थ/ 593/13, दिनांक 25/11/2013 नुसार प्रशिक्षणाचा लाभार्थ्यांनी पुरेपुर लाभ घेतल्याची तसेच प्रशिक्षण गुणवत्ता व उपयुक्तता याची खातरजमा केलीबाबतचा अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) पाठविलेला नाही. तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रशिक्षण वर्गास भेटी दिल्याचे दिसून आले नाही.

5) सदर प्रशिक्षणापासुन प्रशिक्षणार्थी मुलींना फायदा झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही. ते प्राप्त करुन अनुपालन पुर्तता करावी

6) प्रशिक्षणार्थी ज्युडो कराटे उर्तीर्ण असलेबाबत प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

**4.595 माध्यमिक शाळेत जाणा-या मुलींना मोफत सायकल पुरविणे, या योजनेत आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती निफाड, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 35) -** माध्यमिक शाळेत जाणा-या मुलींना मोफत सायकल पुरविणे या योजनेवर रक्कम रूपये 8,67,900/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक डिसीटी/2316/प्र.क्र. 133/का.1417, दिनांक 05/12/2016 अन्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुरुपात मिळणा-या लाभांचे हस्तांतरण, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात करणेबाबत सुचित केलेले आहे. त्यास अनुसरुन पंचायत समिती सेस अंतर्गत सन 2016-2017 या वर्षात माध्यमिक शाळेत जाणा-या मुलींना मोफत सायकल पुरविणेकरीता पंचायत समितीव्दारे 263 पात्र लाभार्थ्यांची निवड करुन शासनाव्दारे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेव्दारे रूपये 3,300/- प्रती लाभार्थी या प्रमाणे रक्कम रूपये 8,67,900/- रोख स्वरुपात अनुदान दिलेले आहे.

2) पंचायत समितीव्दारे 263 पात्र लाभार्थ्यांची निवड करुन शासनाव्दारे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेव्दारे रूपये 3,300/- प्रती लाभार्थी या प्रमाणे रक्कम लाभार्थ्याच्या खात्यावर वर्ग करणे बाबत पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक 17/12/2016 विषय 5 अन्वये ठराव करणेत आलेला आहे. तथापि, प्रती सायकल किंमत रूपये 3,300/- असलेबाबत दरकरार / दरपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सदरहु रक्कम निश्चिती कशाच्या आधारे केली, याबाबत खुलासा सादर करावा.

3) 6 लाभार्थ्यांचे / पालकांचे तहसिलदार कार्यालयाने दिलेले उत्पन्नाचे दाखले अप्राप्त आहेत.

**4.596 भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतील अनियमितताबाबत**

**पंचायत समिती शहादा, जिल्हा नंदूरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकआविवि-2015/प्र.क्र.-18/का-8, दिनांक 18/11/2015 अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार व अदिवासी विकास विभागख् शासन निर्णय क्रमांक आविवि-2016/प्र.क्र.83/कार्यासन–8, दिनांक 05/08/2016 अन्वये 7 महिने ते 6 वर्ष वयोगटातील मुलांसाठी अंडी/केळी रूतुमानानुसार फळे दणेबाबत तरतुद आहे तसेच अदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविवि-2016/प्र.क्र.66/कार्यासन–8, दिनांक 02/08/2016 अन्वये गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देणेबाबत तरतूद आहे. अंगणवाडीमध्ये नोंदणी झाल्यापासुन गरोदर स्त्रियांना बाळंतपणापर्यंत व स्तनदा मातेस बाळंतपणानंतर 6 महिने एक वेळेस चौरस आहार देणेबबत तरतूद आहे. त्या अन्वये पंचायत समिती, शहादा अंतर्गत रक्कम रूपये 4,49,73,245/- खर्च करण्यात आलला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील प्रमाणे आहरीत केलेली रक्कम संबंधित अंगणवाडीच्या आहार समितीच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेली आहे. प्रती लाभार्थी 80 प्रमाणे रक्कम वर्ग करण्यात आलली आहे. तथापि, सदर रक्कम प्राप्त झाल्याची पोहच प्राप्त करण्यात आलेली नाही. तसेच सदर रक्कमेची उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाही.

2) सदर योजनेचा निधी वेगवेगळया यंत्रणेमार्फत संबंधित अंगणवाडीच्या समितीस प्राप्त होत आहे. उदा. गटविकास अधिकारी, महिला बालकल्याण, जिल्हा परिषद व महिला बाल विकास अधिकारी यांचे बीडीएस प्रणालीवर प्राप्त होत आहे. त्यामुळे निधीचे नियोजन व लेखे ठेवण्याबाबत सुसुत्रता येण्यासाठी योजनेच्या अनुदानाची रक्कम एकाच यंत्रणेमार्फत वर्ग करण्यात यावी. यामुळे लेखे ठेवणे सोईचे होईल. वरीलप्रमाणे निधी प्राप्त होत राहिल्यास योजनेत लेख्यांअभावी अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) पंचायत समितीमार्फत तालुक्यातील सर्व अंगणवाडीस अनुदान बँक खात्यात वर्ग करण्यात आलेले आहे तथापि, संबंधित अंगणवाडी यांनी योजनेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे. वेळोवेळी तपासणीसाठी लेखापरीक्षणासाठी उपलब्धा करुन देणे आवश्याक आहे. तथापि, संबंधित अंगणवाडीच्या समितीने लेखे ठेवले किंवा कसे? याची खात्री करता आली नाही.

याबाबत आपल्या स्तरावरुन खात्री करावी व लेखे अदयावत ठेवण्यात यावेत.

4) अनुदानाची मागणी करतांना अगोदर अंदाजित लाभार्थि निवड करुन मागणी करण्यात येते व त्यानुसार अनुदानही संबंधित अंगणवाडीस वर्ग करण्यात येते. तथापि, प्रत्याक्ष लाभ किती लाभार्थ्यांना देण्यात येतो याची परिगणना करण्यात आलेली नाही. त्यामुळे मंजूरी प्रमाणे लाभार्थ्यांना लाभ दिला किंवा कसे? याची खात्री करावी.

5) सदर योजनेचे फलनिष्पती अहवाल प्राप्त करण्यात आलेला नाही.

**4.597 मुलींना संगणक प्रशिक्षण (एमएससीआयटी) योजनेबाबत.**

**पंचायत समिती जामनेर, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 39) -** पंचायत समिती, गटातील मुलींना संगणक प्रशिक्षण (एमएससीआयटी) व संगणक प्रशिक्षण योजनेअंतर्गत 10 टक्के लाभार्थी हिस्स्यावर पंचायत समितीने खालील नमुद केलेप्रमाणे खर्च नोंदविलेला आहे. संगणक प्रशिक्षण : एकुण 72 लाभार्थी प्रती लाभार्थी रूपये 3,450 = रूपये 2,48,400/- इन्स्टीटयुट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी यांना प्रदान केली आहे. सदर योजनांच्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेअंतर्गत लाभार्थी निवडीची प्रक्रिया कशी राबविली, याबाबतचे लेखे / दस्ताऐवज लेखापरिक्षणास उपलबध झाले नाहीत. तसेच पंचायत समिती मासिक सभेत लाभार्थ्यांची यादी मंजुर केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्रं.-76/परा-1, दिनांक 24/01/2014 मधील परिच्छेद क्रमांक 1 तसेच 4 नुसार सदरची योजना राबवावयाची असुन, परिच्छेद क्रमांक 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रशिक्षण शुल्काच्या 10 टक्के इतकी रक्क्म लाभार्थ्यांने स्वत: भरावी, असे नमुद आहे. त्याप्रमाणे संबधीत लाभार्थ्यांनी स्व:हिस्स्याची रक्क्म पंचायत समितीकडे केव्हा जमा केली, याबाबत नमुना नंबर 10 च्या पावत्या किंवा तसेच इतर कोणतेही दस्ताऐवज पंचायत समितीने ठेवलेले नाही तरी लाभार्थ्यांनी 10 टक्के हिस्स्याची रक्क्म वेळीच पंचायत समितीकडे जमा केल्याचे लेखे सादर करुन अनुपालन सादर करावे.

3) लाभार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिल्याचा कालावधी नमूद नाही. तसेच लाभार्थ्यांचा हजेरीपट लेखापरीक्षणास अप्राप्त असल्याने लाभार्थी हजर होते किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

4) सदर लाभार्थ्यांची एमएससीआयटी प्रवेश फी भरल्याबाबतची पावती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

5) सदर लाभार्थ्यांचे परीक्षा पास झाल्याचे गुणपत्रक लेखापरीक्षणास अप्राप्त असल्याने किती लाभार्थी परीक्षेस हजर होते किंवा कसे, याबाबत सत्यता पडताळणी करता आली नाही.

6) लाभार्थ्यांचे प्रस्तावासोबत जोडलेले छायाकिंत दाखले प्रमाणित केलेले नाहीत. तसेच सदरचे प्रस्ताव कार्यालय प्रमुखांचे स्वाक्षरीने प्रमाणीत केलेले नाही.

7) सदर प्रशिक्षण हा कार्यक्रम शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल), मुंबई यांचेकडे हस्तांतरीत केलेला असल्याने या महामंडळाचे अधिकृत प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण आयोजित करावयाचे आहे. पंचायत समितीने यासाठी इन्स्टीटयुट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी यांना रक्क्म प्रदान केलेली आहे. सदर संस्था एमकेसीएल अंतर्गत नोंदणीकृत असलेबाबत प्रमाणित करावे.

**4.598 पंचायत समितीसेस 10 टक्के मधून ग्रामीण भागातील महिलांसाठी शिलाई मशिन खरेदी करणे.**

**पंचायत समिती एरंडोल, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती सेस 10 टक्के मधून ग्रामीण भागातील महिलांसाठी शिलाई मशिन खरेदी करणेकरीता रक्कम रूपये 2,98,200/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2010/प्र.क्र.76/परा-1 दिनांक 24/01/2014 नुसार लाभार्थी हिस्सा प्रथम बँकेत भरणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. लाभार्थ्यांकडुन लाभार्थी हिस्सा वसुल करुन नंतर संबधितांना लाभ देणे आवश्यक होते. असे असताना लाभार्थ्यांकडून लाभार्थी हिस्सा वसुल केलेला नाही. तरी लाभार्थी हिस्यांची रक्कम रूपये 29,820/- वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

2) नोंदणीकृत दुकानदाराकडूनच जिल्हा परीषद व पंचायत समिती यांनी साहीत्य खरेदी करणे क्रम:प्राप्त असतांना तसे न करता अनोंदणीकृत दुकानदराकडून साहित्य खरेदी केलेमुळे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्रक्र 416/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षिक नियोजन कालावधी निश्चित केलेला आहे. त्यानुसार योजना राबविणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक मागास 1089/प्रक्र/597/34, दिनांक 05/10/1989 नुसार सर्व योजनातर्गत लाभ दिल्या जाणा-या लाभार्थीची मास्टर नोंदवही परिरक्षीत केलेली नाही. त्यामुळे एकाच घरातील व्यक्तींना दुबार लाभ दिला नसल्याचे प्रमाणीत करुन सदर नोंदवही अद्यावत करुन पुर्तता करावी

5) सदरचे साहित्य प्राप्त असुन त्याची नोंद साठा नोंदवहीत नोंद घेण्यात आली आहे. साहित्य प्राप्त झाल्यानंतर 100 टक्के रक्कम गुणवत्ता अहवालानंतर अदा करणेबाबत उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परीच्छेद क्रमांक 8-6 मधील अटी व शर्तीमध्ये नमुद असतांना नियमबाह्य एकदाच रक्कम अदा करण्यात आली आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 96 प्रमाणे रक्कम अदा करण्यापुर्वी मालसाठा नोंदवहीत त्याचा दर्जा व प्राप्त साहित्य नगाप्रमाणे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.599 10 टक्के अनुदानावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांसाठी 8 लिटरचा प्रेशर कुकर खरेदी पंचायत समिती कर्जत, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती कर्जत महिला बालकल्याण 10 टक्के अनुदानावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांसाठी 8 लिटरचा प्रेशर कुकर खरेदीवर रक्कम रुपये 2,01,824/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिला जावू नये याबाबत उपाययोजना केलेला नाही. त्यानुसार खात्री करून अनुपालन सादर करावे

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांकमागास/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/01/1993 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले, त्याच वित्तीय वर्षात वाटप होणे आवश्यक असतांना सदरचे साहित्य विहीत मुदतीत वाटप करण्यात आलेले नाही.

3) शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 चे निर्णयाप्रमाणे साहित्याचा लाभ मिळाल्यानंतर त्याचे आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली, याबाबतचा अहवाल नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1099/प्र.क्र.78/05, दिनांक 09/01/1997 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे वैयक्तिक लाभांच्या योजना राबविताना साहित्य खरेदी करण्यापूर्वी लाभार्थी निवड पूर्ण होणे आवश्यक आहे.

4) लाभार्थ्यांचे प्रस्तावांची पडताळणी करतांना द्रौपदाबाई पन्नालाल गाडसे, सुनिता जालिंदर पवार, अनिता नागेश जाधव लाभार्थ्यांचे प्रस्तावास गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाही.

5) लाभार्थ्यांचे प्रस्तावांची पडताळणी करतांना माधुरी अनिल ससाणे, प्रियंका हेमंत शेलार, प्रियंका विकास शेलार या लाभार्थ्यांचे प्रस्तावासह अर्ज व इत्तर बाबी पडताळणी कामी प्राप्त झाला नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1089/846/266/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे साहित्य वाटपानंतर संबंधितांचे (लाभार्थ्यांचे) सर्वेक्षण करुन फलश्रृती अहवाल प्राप्त करुन घेतलेले नाही.

7) वरील नमूद साहित्य 8 प्रेशर कुकर लेखापरीक्षण कालावधीपर्यंत शिल्लक असल्याचे आढळून आले. वाटप करून पूर्तता करण्यात यावी.

**4.600 20 टक्के पंचायत समिती उपकर निधीतून मागास वर्गीय मुला/मुलींना सायकल पुरविणे.**

**पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 54) -** मुलींच्या सायकल एकूण 188 नग प्रति नग रुपये 4,200/- प्रमाणे सायकल पुरवठा करणेत आला आहे. सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 7,89,600/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील तांत्रिक मान्यता आदेशामधील अट क्रमांक 4 नुसार लाभार्थींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रूपये 50,000/- चे आत असणे आवश्यक आहे. परंतु, लाभार्थींचे उत्पन्नाचे दाखले नस्तीसोबत नसलेने योग्य लाभार्थीस दिला असलेची खात्री करता आली नाही.

2) लाभार्थ्यांची निवड करुन त्यास पंचायत समितीची मान्यता घेऊन व त्याचा लाभार्थी हिस्सा रक्कम जमा करुन घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1020/प्रक 14/38 दिनांक 09/02/2001 मध्ये नमुद केलेप्रमाणे लाभार्थी निवडीबाबतची योग्य ती खबरदारी घेण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर / 2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्रक्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ ' प्रपत्राप्रमाणे विहीत नमुण्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय / गावनिहाय व कुटुंबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पंचायत समितीकडुन वैयक्तीक सहाय्य दिलेल्या लाभार्थींच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थींच्या सर्व नोंदी जात व गाव निहाय व कुटुंबनिहाय घेवुन शासन निर्णयातील अनुक्रमांक 1.5 मधील 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस / कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री सद नोंदवही ठेवली नसलेने करता आली नाही. सदर लाभार्थींची मास्टर नोंदवही शासन निर्णयामध्ये नमुद केलेप्रमाणे ठेवुन अध्ययावत करून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

5) उपरोक्त आदेशान्वये 188 सायकल पंचायत समिती, जुन्नर यांना पुरवठा करणेत आला असुन दिनांक 31/03/2017 अखेर लाभार्थींना वाटप करणेत आले नसल्याने 188 नग पंचायत समितीकडे शिल्लक आहेत. त्यामुळे सदरचे लाभार्थी योजनेचा लाभ घेणेपासून वंचित राहीले आहेत. सदर सायकल त्वरीत लाभार्थींना वाटप करुन पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

6) खरेदी नियम पुस्तिका 1978 चा कलम 10 (अ) नुसार माल उशीराने पुरवठा केलेबाबत दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. मालाच्या किंमतीच्या 0.5 टक्के प्रती आठवडा याप्रमाणे रक्कम रुपये 68,208/- संबंधीताकडुन दंड वसुल करुन शासन सदरी भरणा केल्याची पूर्तता दाखवावी.

**4.601 10 टक्के महिला व बालकल्याण जिल्हा परिषद निधीतुन पिको फॉल मशीन वाटपाबाबत.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 51) -** पंचायत समिती, शिरूरचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात समाजकल्याण विभागातुन जिल्हा परिषद निधीतुन 10 टक्के जिल्हा परिषद निधीतुन महिला व बालकल्याण मधून पिको फ़ोल मशीन वाटपाबाबत पुरवठा आदेश क्रमांक जाक्र जिप माबाक योजना /10टक्के/2922016/17, दिनांक 07/09/2016 अन्वये व चलन क्रमांक 412 दिनांक 07/09/2016 अन्वये 160 नग प्राप्त असुन प्रती नग रक्कम रुपये 12,250/- दर्शविली आहे. एकूण रक्कम रूपये 19,60,000/- खर्च केला आहे. सदर साहित्य साठा नोंदवही व वाटप साहित्यांचे प्रस्ताव तपासणी केली असता सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर नस्तीसोबत गट स्तरावरील एकूण लाभार्थ्यांचे मागणी प्रस्ताव व त्यापैकी जिल्हा परिषदेकडे मंजुरीस्तव पाठविण्यात आलेली यादी व त्यापैकी जिल्हा परिषद विषय समितीने मंजूर केलेली लाभार्थी यादी लेखापरीक्षणास प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यानुसारच साहित्य वाटप केले, याबाबत खात्री करता आली नाही.

2) सन 2016-2017 मध्ये लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. परंतु, मागील वर्षांकरीताची लाभार्थी मास्टर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. शासन निर्णयातील अनुक्रमांक 1.5 मधिल 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस / कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री सदर मगील वर्षात नोंदवही ठेवली नसलेने करता आली नाही. सदर लाभार्थीची मास्टर नोंदवही शासन निर्णयामध्ये नमुद केलेप्रमाणे ठेवुन अध्ययावत करुन पुर्तता एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस / कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबत लेखापरीक्षणास दाखवावी. 2 लाभार्थींना एकाच कुटुंबात दुबार लाभ दिलेने रक्कम रुपये 11,025/- वसूल करून जिल्हा निधीत भरणा करण्यात यावा.

3) उपरोक्त आदेशान्वये 160 पिको फ़ोल मशीन यांना पुरवठा करणेत आला असुन लेखापरीक्षण कालावधी अखेर 122 नग लाभार्थिना वाटप करणेत आले असुन अद्याप 33 नग पंचायत समितीकडे शिल्लक आहेत. त्यामुळे 33 नगाची किंमत अनुदानाची रक्कम रुपये 3,63,825/- विनाकारण अडकुण पडले आहेत. सदर साहित्य लाभार्थींना वाटप करुन पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

4) सदर साहित्य वाटप प्रस्ताव तपासणी केली असता 2 लाभार्थ्यांच्या नस्तीसोबत उत्पन्नाचा दाखला जोडण्यात आलेला नाही. तरी लाभ दिलेले लाभार्थी अल्प उत्पन्न गटातील होते, याची खात्री पटवावी.

5) सदर साहित्य वाटप प्रस्ताव तपासणी केली असता 3 लाभार्थ्यांकडे विद्युत कनेक्शन असल्याबाबत वीज बिल जोडलेली नाही.

6) साठा नोंदवहीमधील नोंदीनुसार वाटप केलेल्या लाभार्थीच्या स्वाक्षरी व लाभार्थी मागणी/ नस्तीसोबत जोडण्यात अर्जावरील स्वाक्षरी यामध्ये 2 लाभार्थ्यांचे स्वाक्षरीत तफावत दिसून आलेली आहे. यावरून असे दिसून येते की, लाभ दिलेले लाभार्थी योग्य असल्याचे लेखापरीक्षणास दिसून येत नाही.

7) वाटप केलेल्या पिको फॉल मशिन 122 नगांची 10 टक्के रक्कम रुपये 1,225/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 1,49,450/- ची चलने जिल्हा निधीत भरणा केलेचे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे जिल्हा निधीत सदर रक्कम जमा झालेबाबतची खात्री करता आली नाही.

**4.602 महिला व बालकल्याण विभागामार्फत सौर कंदील वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती भोर, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, भोर येथील लेखापरिक्षण सन 2016-2017 मध्ये महिला व बालकल्याण विभागाकडील सर्वसाधारण योजनेतुन सौर कंदील साहित्य वाटप करण्याबाबात रककम रूपये 18,32,220/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सर्वसाधारण लाभार्थी मंजूरी उपमुख्यकार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी 737 लाभार्थी प्रस्तावास दिली असता 810 साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे. प्रतिक्षा यादीतील लाभार्थी निवड करून साहित्य वाटप करणे आवश्यक असता तसे केलेले नाही.

2) लाभार्थी शिफारस प्रस्तावावर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच प्रस्तावासोबत जोडलेली कागदपत्रे साक्षांकित केलेले नाहीत.

3) तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता अटी व शर्ती नुसार लाभार्थी निवड ग्रामसभेव्दारे करणे आवश्यक असे असताना लाभार्थीचे निवड ग्रामसभेत केल्याबाबतचे ग्रामसभेचे ठराव संचिकेस नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1020/प्र.क्र.14/38/ दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थीच्या निवडीच्या निकषावर लाभार्थ्यांकडून सादर झालेली कागदपत्रे यांची काळजीपुर्वक छाननी प्रत्येक स्तरावर होणे गरजेचे आहे. ठरविलेल्या निकषांमध्ये न बसणारा लाभार्थी निवडणे किंवा प्रस्तावित करणे ही गंभीर अनियमितता समजली जावी, असे असताना खालील नमूद केल्या प्रमाणे एकून 10 लाभार्थ्यांना मंजुरी नसताना साहित्य वाटप करण्यात आले आहे. योजनेचा लाभ देताना पात्र लाभार्थ्यांना लाभ न देता निवड न झालेल्या लाभार्थ्यांना लाभ दिलेने योजनेचे उद्दिष्ट सफल होत नाही. त्यामुळे सौर कंदील योजनेचा लाभ दिलेल्या 10 लाभार्थ्यांकडून अनुदान रक्कम रुपये 20,360/- वसुलात आणावी.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुददा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र अ प्रपत्राप्रमाणे विहित नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय / गाव निहाय लाभ दिलेल्या लाभार्थीच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थीच्या सर्व नोंदी जात व गावनिहाय घेऊन शासन निर्णयातील अनुक्रमांक 1.5 मधील 1 मध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने एकुण 22 लाभार्थीस योजनेचा लाभ दुबार दिले असलेबाबत लेखापरीक्षणास तपासणी अंती दिसून आले.

22 दुबार लाभार्थीना दिलेली रक्कम रूपये 44,792/- वसुलात आणावी.

6) जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा सहिता 1968 नुसार नमुना नंबर 4 पीटीकॅशबुक ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे 10 टक्के लाभार्थी हिस्सा किती व कोणत्या लाभार्थ्यांचा जमा झाला त्याचा मेळ घेता आलेला नाही. एकूण 305 लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. 10 टक्के लाभार्थी हिस्सा रूपये 68,930/- रक्कमेचे चलन भरणे आवश्यक असता भरणा चलने नस्तीसोबत उपलब्ध झाली नाहीत. चलने उपलब्ध करून 10 टक्के लाभार्थी हिस्सा भरणा केलेबाबत पूर्तता दाखवावी अन्यथा संबंधिताकडुन वसुल करुन भरणा करावा

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पं.रा.स./1080 /सीआ र / 1074/57, दिनांक 29/09/1983 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना तसा अहवाल प्राप्त झाला नाही.

**4.603 पंचायत समिती महिला सदस्यांना अभ्यास दौरा खर्चाबाबत.**

**पंचायत समिती कोरेगाव, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** अभ्यास दौऱ्यासाठी पंचायत समिती, कोरेगांव यांनी दरपत्रके मागवून अभ्यास दौऱ्यासाठी रक्कम रुपये 2,98,310/- खर्च केलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने अभ्यास दौऱ्यासाठी ट्रॅव्हल कंपनीकडून दिनांक 14/12/2016 रोजी टेंडर जाहीर केल्याबाबत नमूद केले असून प्रत्यक्षात नस्तीसोबत कागदपत्रे जोडण्यात आलेली नाहीत व प्रत्यक्षात दिनांक 23/02/2017 रोजी बाजारातून तीन दरपत्रके मागवून दिनांक 03/03/2017 पर्यंत मुदतीची निविदा काढण्यात आलेली असून प्राप्त तीन दरपत्रके पहाता लिफाफ्यावर आवक नंबर व दिनांक नमूद नाही.

2) पंचायत समिती, कोरेगांव यांनी दिनांक 03/03/2017 रोजी उपलब्ध दरपत्रके उघडण्यात आल्याबाबत गटविकास अधिकारी यांनी लिफाफ्यावर स्वाक्षरी करण्यात आलेली असून प्रत्यक्षात गटविकास अधिकारी यांच्या वाहन क्रमांक एम.एच.11 ए.बी. 1212 चे लॉगबुक पाहता सकाळी 7.00 त 20.40 पर्यंत गटविकास अधिकारी यांनी नलवडेवाडी, तळीये, विखळे, बिचुकले, फडतरवाडी याठिकाणी भेट दिल्याचे दिसून येते. म्हणजेच नमूद केलेल्या दिनांकास गटविकास अधिकारी हजर नसल्याने दरपत्रके उशीराने उघडल्याचे व मागील दिनांक नोंदविल्याचे दिसते. सदर बाब नियमबाहय व गंभीर आहे.

3) पंचायत समिती दौरा दरपत्रके मागवितांना अटी व शर्तीमध्ये ट्रॅव्हल कंपनीला पर्यटन विभागाचे नोंदणीकृत प्रमाणपत्र, परराज्यातील दौरा असल्याने एजन्सीकडे मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा अवगत गाईड, अभ्यास दौऱ्यामध्ये कोणकोणत्या स्थानिक स्वराज्य संस्थेस भेट देण्यात आल्या आहेत, त्या संस्थांची माहिती इत्यादी नमूद न करता प्राप्त दरपत्रके पहाता केरळ राज्यातील प्रेक्षणिय स्थळे भेट इत्यादींबाबत ट्रॅव्हल कंपनीने वर नमूद केल्याचे दिसून येते. त्यामुळे केवळ प्रेक्षणिय स्थळे पाहणे हाच उद्देश दिसून येतो. याबाबत योग्य ते नियोजन पंचायत समितीने केल्याचे दिसून येत नाही.

4) नस्तीसोबत तावरे ट्रॅव्हल्स, सातारा यांनी दिनांक 02/03/2017 रोजी दौऱ्यासाठी रक्कम रुपये 1,50,000/- तसलमात मिळण्याबाबतचा अर्ज केलेला असून प्रत्यक्षात त्यांना प्रमाणक क्रमांक 1 दिनांक 03/03/2017 अन्वये सदरची रक्कम अदा केल्याचे दिसून येते. म्हणजेच निविदा कालावधीपूर्वीच ट्रॅव्हल एजन्सीला तसलमात मंजूरी केल्याने पंचायत समितीने ठेकेदारास रक्कम प्रदान केली आहे. सबब पुर्वनियोजित संगनमताने

सदरचा ठेकेदार नियुक्ती केली असून दरपत्रके प्राप्त झाल्याचे फक्त कागदोपत्री दर्शविले आहे. सदर बाब नियमबाहय व गंभीर आहे. याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**4.604 मुलींना व महिलांना शिवणकाम व फॅशन डिझाईनचे प्रशिक्षण देणेबाबत.**

**पंचायत समिती वाळवा - इस्लामपूर, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविलेल्या मुलींना व महिलांना शिवणकाम व फॅशन डिझाईनचे प्रशिक्षण देणेबाबत रक्कम रूपये 1,57,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/33/ प्रक्र446/वित्त9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषद / पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येणा-या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणीसाठीचे वेळापत्रक निश्चित केलेले आहे. सदरच्या वेळापत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास2012/प्र.क्र.104/ वित्त-03, दिनांक 16/10/2012 अन्वये लाभार्थी यादी निश्चित करून मान्यता घ्यावी. लाभार्थी निवडीचा ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. सबब लाभार्थ्याच्या निवडीबाबत खात्री करता आली नाही.

3) लाभार्थ्यांचे प्रस्ताव उपलब्ध झाले नाहीत.

4) जाहिर निविदा नोटीसमधील अटी व शर्ती क्रमांक 3 अन्वये सदर प्रशिक्षण कमीत कमी 1 महिना अथवा 30 तास इतक्या कालावधीमध्ये पूर्ण करणेबाबत नमूद केले आहे तथापि, कार्यारंभ आदेश क्रमांक एबाविसेयो/मबाक/वशि/409/2016, दिनांक 17/10/2016 अन्वये प्रशिक्षणाचा कालावधी 3 महिने अथवा 90 तास नमूद केला आहे. सदर तफावतीबाबत खुलासा करावा.

5) जाहिर निविदा नोटीस नुसार प्रशिक्षणासाठीची दरपत्रके दिनांक 14/10/2016 पर्यंत दुपारी 3:00 वाजेपर्यंत कार्यालयास सादर करणेबाबत नमूद केले आहे. तथापि, कार्यालयास प्राप्त तीनही दरपत्रक लखोटयावर आवक क्रमांक व दिनांक नमूद नाही. सदर लखोटे वेळेत प्राप्त झाल्याची खात्री होत नाही.

6) जाहिर निविदा नोटीसमधील लखोटा 1 साठी नमूद केलेल्या अट क्रमांक 2 अन्वये प्रशिक्षण संस्था यांनी व्यावसायीक व तांत्रिक शिक्षण शासन मान्यसंस्थेचे प्रमाणपत्र प्राप्त प्रशिक्षकाकडून प्रशिक्षण देणेबाबत नमूद केले आहे. तथापि, तीनही दरपत्रक धारकांच्या लखोटयासोबत शासनमान्य संस्थांचे प्रमाणपत्र असलेल्या प्रशिक्षकांची यादि जोडलेली नाही. सबब लाभार्थ्याचे प्रशिक्षण हे शासनमान्य संस्थांचे प्रमाणपत्र असलेल्या प्रशिक्षकामार्फत झाल्याची खात्री होत नाही.

7) लाभार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षण कालावधीमधील हजेरीपत्रक/उपस्थितीपत्रक नाही. सबब लाभार्थ्याच्या उपस्थितीबाबत खात्री करता आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास / सीआर 1633 / 57, दिनांक 19/01/1998 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिस्स्याची रक्कम प्रथम वसुल करणे आवश्यक आहे. तथापि, कार्यारंभ आदेश क्रमांक एबाविसेयो/मबाक/वशि/409/2016, दिनांक 17/10/2016 अन्वये 10 टक्के लाभार्थी हिस्सा प्रशिक्षण संस्थेने लाभार्थ्यांकडून घेणेबाबत सूचित केले आहे. लाभार्थी हिस्सा हा योजना सुरु होण्यापुर्वी लाभार्थ्यांकडून गोळा करुन संबंधित प्रशिक्षण संस्थेस अदा करणे योग्य होते

9) लाभार्थी निहाय गाव निहाय मास्टर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने लाभार्थ्यास यापूर्वी लाभ दिला का कसे, याची खात्री करता आली नाही वा दुबार लाभ झाला किंवा कसे, याबाबतची खात्री करता आली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2007/प्र.क्र.4871/वित्त-3, दिनांक 25/06/2014 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना त्यात एकूण लाभार्थ्यापैकी 3 टक्के 4 लाभार्थी अपंग प्रवर्गातील असावेत, असे स्पष्ट केले आहे. सदर प्रमाणे कार्यवाही झाल्याची खात्री करून द्यावी.

11) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094 / सीआर-2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थ्याच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा झाल्याबाबतचा अहवाल घेणे आवश्यक आहे.

**4.605 महिलांना व्यवसायिक व तांत्रीक प्रशिक्षण (शिवणकाम व फॅशना डिझायनिंग प्रशिक्षण ) 90 टक्के अनुदानाबाबत.**

**पंचायत समिती शिराळा, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** याबाबत रक्कम रूपये 1,41,750/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जाहीर कोटेशन नोटिस अन्वये प्रशिक्षण देणारी संस्था शासन मान्य नोंदणीकृत असावी. तांत्रिक प्रशिक्षण हे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र प्राप्त असलेलेल्या प्रशिक्षकाकडूनच देणेचे आहे. असे असताना लेखापरीक्षणास असे अभिलेखे सादर करण्यात आले नांही.

2) बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे आदेश क्रमांक 31/2016 दिनांक 01/11/016 अन्वये दिनांक 29/09/2016 ते 28/10/2016 या कालावधीत श्रीराम स्वंयरोजगार विकास यांनी प्रशिक्षण पुर्ण केले असून90 टक्के रक्कम रूपये 1,41,750/- मंजूर करण्यात आली आहे. प्रथम लाभार्थी यांचे नावास मंजूरी प्रदान करणे व परिपुर्ण अर्ज सादर करणाऱ्या लाभार्थ्यांचे अर्ज मान्य करून सभेमध्ये मंजूरी प्रदान करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नांही. अर्जावर दिनांक नमुद नाही. आवक क्रमांक नमुद नांही. सदर प्रशिक्षण हे कोकरुड व सागाव या ठिकाणी घेण्यात आलेले आहे. त्यानुसार लाभार्थी यांचे अर्जाची तपासणी केली असता उत्पन्न प्रमाणपत्र तसेच राहिवासी प्रमाणपत्र प्रशिक्षण झाल्यानंतरचे दिनांकास प्राप्त करण्यात आले आहे.

3) तीन निविदा फॉर्मची रक्कम रूपये 200*3= 600/- वसूल करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नांही.

4) संबधीताकडून 10 टक्के प्रमाणे रक्कम रूपये 16,223/- आयकर वसूल करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नांही.

**4.606 डॉ. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती चिखलदरा, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** डॉ ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेवर रक्कम रूपये 1,27,90,581/- खर्च केला आहे. सदर योजना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना चिखलदराने राबविली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना ही सन 2015-2016 अंमलात आली. मागील वर्षी योजनेचे अंकेक्षण करण्यांत आले होते. मागील वर्षीच्या लेखा परिक्षणातील आक्षेप ज्या बाबींवर आक्षेप नोंदवण्यांत आले, ते कायम असुन त्यात कुठल्याही प्रकारची सुधांरणा आढळली नाही, ही अत्यंत खेदजनक बाब आहे.

2) मोथा बिटमधील अंगणवाडी आडनदी 1 माहे मे महिन्यात स्तनदा माता व गरोदर स्त्रिया लाभार्थी नसतांना रूपये 1,650/- आहाराप्रीत्यर्थ खर्च दर्शवण्यांत आला आहे. ते वसुल करावे.

3) वाढीव कालावधीसाठी एक वेळ चौरस (अमुत) आहार दयावयाचा असल्याने अंगणवाडीनिहाय लाभार्थीची संख्या विचारात घेउन उपमुख्य कार्यकारी बालकल्याण हयांनी आहार समितीच्या बॅंक खात्यामध्ये तीन महिन्यांचे अगाऊ अनुदान जमा करावे, असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) एकात्मिक बाल विकास प्रकल्पं चिखलदारा हयांनी लेखापरिक्षणांस उपलब्ध करून दिलेला मासिक अहवाल व अंगणवाडी काजलडोह 3 येथील माहे जुन 2016 लाभार्थी उपस्थिती नोंदवही तपासली असता सहा गरोदर स्त्रिया व तीन स्तनदा माता योजनेचा लाभ देण्यांत आला. एकुण 9 लाभार्थीना महिन्यात 25 दिवस चौरस (अमुत) आहार दिल्यास एकुण 225 लाभार्थी होतील. मात्र प्रत्यक्षात 204 लाभार्थीना लाभ देण्यांत आला. काही लाभार्थीनी 25 दिवस आहार घेतला नाही.

5) एकात्मिक बाल विकास प्रकल्पं चिखलदारा हयांनी लेखापरिक्षणांस उपलब्ध करून दिलेला मासिक अहवालाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, मोथा बिटमधील अंगणवाडी आमझरी 2 माहे मे महिन्यात 0 लाभार्थीना लाभ दिला. माहे जुन व जुलै 2016 मध्ये अकरा वेळा चौरस (अमुत) आहाराचा लाभार्थीना लाभ देण्यांत आला. माहे ऑगस्ट 2016 शहात्तंर वेळा चौरस (अमुत) आहाराचा लाभार्थीना लाभ देण्यांत आला. यावरून असे निर्दशनास येते की, गरोदर स्त्रिया व तीन स्तनदा माता या चौरस (अमुत) आहार घेण्यास अंगणवाडीपर्यंत जात नाही वा योजना त्याच्यापर्यंत पोहचली नाही.

6) बाल विकास प्रकल्प अधिकारी हयांनी दर महिन्याला 20 अंगणवाडयांना व मिनी अंगणवाडयांना भेट देउन एक वेळ आहार योजनेची तपासणी करावी. त्या अनुषंगाने अंगणवाडी आलाडोह भेट पुस्तिकेची तपासणी केली असता प्रकल्पं अधिकारी, एकात्मिक बाल विकास हयांनी अमृत आहार दोन मातांना देण्यांत येत असल्याचे भेट पुस्तिकेत नमुद केले आहे. मात्र अंगणवाडी आलाडोहच्या मासिक अहवालातील नोंदीत विसंगती आढळुन येते. उदा. माहे जुन व जुलै महिन्यात एकोणसत्तर वेळा अमुत आहार देण्यांत आला. माहे ऑगस्टंमध्ये बहात्तर वेळा चौरस आहार देण्यांत आला. एका लाभार्थीस शासन निर्णयानुसार पंचवीस वेळा महिन्याला चौरस (अमुत) आहार देण्यांत येतो व दोन लाभार्थीना पन्नास वेळा, मात्र अंगणवाडी आलाडोहने प्रकल्पं अधिकारी, एकात्मिक बाल विकास हयांनी भेट पुस्तिकेत नमुद केले त्यापेक्षा जादा लाभार्थींना लाभ दिल्याचे दर्शवुन रककम खर्ची टाकल्याची शकयता नाकारता येत नाही. सबब ती रककम रू 1,500/- वसुल करावी.

7) मोथा बिट मधील अंगणवाडी लवादा इथे एका वर्षात एकाही लाभार्थीची नोंद नसतांना दोन सेविकांना कामावर ठेवण्याची आवश्यकता काय? सबब एका सेविकेस आहार तयार करण्यासाठी देण्यात येणारी रककम रूपये 250/- याप्रमाणे बारा महिन्यांचे एकुण रूपये 3,000/ लेखापरिक्षणात अमान्यं करण्यांत येत आहे.

8) प्रकल्पं अधिकारी, एकात्मिक बाल विकास, चिखलदरा हयांनी अंगणवाडीच्या भेटी दरम्यान अन्नाची स्वच्छता, लसीकरण, साहित्यं खरेदीचे लेखे तपासावे असे असतांना ते तपासल्याबाबत अंगणवाडीच्या भेट पुस्तिकेच्या तपासणीत आढळले नाही व त्याचा अहवाल जिल्हास्तरीय समितीस सादर करावावयाचा आहे. त्याप्रमाणे अहवाल सादर केल्याबाबत दस्तावेज लेखापरिक्षणांस उपलब्ध करून दिले नाही.

9) उपयोगीता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर केली नाही.

10) उपलब्ध अनुदानाच्या चाळीस टक्के निधी अखर्चीत राहीला. यातुन नियोजनाचा अभाव असल्याचे प्रकर्षाने दिसुन येते. योजना लोकांपर्यंत पोचवण्यास प्रकल्पं अधिकारी व त्याचे कर्मचारी कमी पडले.

**4.607 अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना दयावयाच्या अमृत आहार योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती धारणी, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना दयावयाच्या अमृत आहार योजनेकरिता रक्कम रूपये 2,00,48,125/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) माहे मार्च-एप्रिल 2016 या दोन महिन्यांकरीता एकुण 3,502 लाभार्थ्यांना रुपये 43,77,500/- आणि मे-जून 2016 या दोन महिन्यांकरीता एकुण 1,925 लाभार्थ्यांना रुपये 24,06,250/- एवढे अनुदान वितरीत करणे आवश्यक होते. तथापि, पंचायत समितीने उपरोक्त नमूद प्रमाणक क्रमांक 3 अन्वये माहे मार्च-एप्रिल 2016 करीता रुपये 21,88,750/- आणि प्रमाणक क्रमांक 53 अन्वये माहे मे-जून 2016 करीता रुपये 12,03,125/- एवढे म्हणजेच फक्त 50 टककेच अनुदान वितरीत केले. लाभार्थी संख्येचे प्रमाण लक्षात घेता रुपये 33,91,875/- एवढे कमी अनुदान वितरीत करण्यात आले. सदर बाबीवरुन हा निष्क्रर्ष निघतो की, एकतर अंगणवाडी केंद्रावर नोंदविण्यात आलेली लाभार्थ्यांची संख्या चूकीची नोंदविण्यात आली किंवा लाभार्थ्यांच्या संख्येनुसार कमी अनुदान वितरीत करण्यात आले. ज्या उदात्त हेतूने सदर योजना राबविण्याबाबत शासनाने आदेशीत केले होते, त्याप्रमाणे त्याचा लाभ अनुसूचित क्षेत्रातील गरोदर माता व स्तनदा मातांना होणे आवश्यक होते. परंतू, तो हेतूच साध्य झाल्याचे दिसून

आले नाही. अमृत आहार योजनेचा लाभापासून संबंधित गरोदर व स्तनदा मातांना वंचित ठेवण्याच्या कारणाबाबत संबंधिताकडून आवश्यक तो खुलासा करण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

2) सदर योजनेचा परिणाम अधिक चांगला होण्याचे दृष्टिने शासन निर्णय क्रमांक आविवि 2016/प्र.क्र.66/ कार्यासन-8, दिनांक 02/08/2016 अन्वये स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून बाळंतपणापर्यंत तसेच स्तनदा मातांना बालकाच्या जन्मानंतरचे पहिले सहा महिने अशा त-हेने कालावधी वाढविण्यात येऊन दिनांक 09/08/2016 पासून सदर वाढीव कालावधीची अंमलबजावणी करण्याबाबत आदेश देण्यात आले. सदर योजनेचा कालावधी वाढल्यामुळे माहे ऑगस्ट 2016 पासून गरोदर व स्तनदा स्त्रियांच्या संख्येत दुपटीहून अधिक वाढ होणे अपेक्षीत होते. परंतू, पंचायत समिती, धारणी अंतर्गत अंगणवाडयांमध्ये माहे मार्च व एप्रिल 2016 महिन्यांत नोंदविण्यात आलेली संख्या माहे ऑगस्ट 2016 पासून पुढे कमी झालेली आढळून आली.

3) लेखापरीक्षणाचे अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 21/07/2017 अन्वये योजनेंतर्गत प्राप्त निधी, खर्च, शिल्लक रक्कम, लाभार्थी नोंदवही, अंगणवाडी सेविकांनी ठेवलेले आवश्यक ते अभिलेखे, तसेच योजनेचा मासिक आढावा बैठकीचा अहवाल इत्यादी अभिलेखे सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, सदर अभिलेखे प्राप्त झाले नाहीत.

4) शासन निर्णय दिनांक 18/11/2015 मधील मुददा क्रमांक 2 (12) नुसार आहार घटक खरेदीसाठी एक महिन्याचे आगाऊ अनुदान तसेच शासन निर्णय दिनांक 02/08/2016 मुददा क्रमांक 5 अन्वये वाढीव संख्या लक्षात घेता तीन महिन्यांचे आगाऊ अनुदान खात्यामध्ये जमा करावयाचे होते. परंतू, पंचायत समितीमार्फत संबंधित खात्यामध्ये अनुदान आगाऊ जमा न करता कालावधी उलटून गेल्यानंतर केले आहे.

5) माहे मे व जून 2016 मध्ये लाभार्थी मातांची संख्या मार्च-एप्रिल 2016 चे तूलनेत अर्ध्यावर आली आहे. लाभार्थी मातांची संख्या कमी होण्यामागे लाभार्थी माता कामाकरीता गांव सोडून गेल्यामुळे संख्येवर परिणाम झाल्याचे तोंडी सांगण्यात आले. तथापि, या पृष्ठयर्थ कोणताही अहवाल तथा अभिलेख्याची मागणी केली असता सादर करण्यात आला नाही.

6) माहे जूलै 2016 या महिन्यात पूर्वी देण्यात आलेले अनुदान शिल्लक असल्यामुळे अनुदान वितरीत करण्यात आले नसल्याचे कळले. परंतू, माहे मार्च ते जून या महिन्यांत लाभार्थ्यांच्या संख्येनुसार 100 टक्के ऐवजी 50 टक्केच अनुदान वितरीत करण्यात आल्यानंतरही जूलै महिन्यात अनुदानाची आवश्यकता भासत नाही यावरुन शासन निर्णयातील मुददा क्रमांक 3.3 व 3.4 अन्वये जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीने योग्य नियोजन करुन खर्चाचा आढावा घेतल्याचे दिसून येत नाही. मुददा क्रमांक 3.3 नुसार योजनेतील कामाचा व फलनिष्पत्तीचा आढावा घेण्यासाठी किमान दोन महिन्यातून एकदा बैठक घेणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अंगणवाडी केंद्राचा तपासणी अहवाल समितीसमोर सादर करणे व मुददा क्रमांक 3.4 नुसार प्रकल्प अधिकारी यांनी एका महिन्यामध्ये किमान 20 तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एका महिन्यामध्ये किमान 10 अंगणवाडी केंद्राची दिलेल्या निकषानुसार आहार योजनेची तपासणी करावी. तसेच खरेदीचे लेखे तपासून त्याबाबतचा अहवाल जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीस सादर करावा. तथापि, जिल्हास्तरीय संमितीने याबाबत आवश्यक ती अंमलबजावणी केल्याचे आढळून आले नाही.

**4.608 पंचायत समिती सेस फंडातून वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांना75 टक्के अनुदानावर सौर कंदील वाटप योजना मधील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती मानोरा, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 37) -** पंचायत समिती, मानोरा येथे सन 2016-2017 मध्ये पंचायत समिती सेस फंडातून वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत सर्वसाधारण महिलांना 75 टक्के अनुदानावर सौर कंदील वाटप योजना राबविण्यांत आली आहे. सदरबाबत रक्कम रुपये 4,98,955/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 25 टक्के लाभार्थी हिस्स्याची एकुण रक्कम रूपये 1,66,239/- पैकी रूपये 93,141/- हे मे. लॉर्डस् मार्क्स इन्डस्ट्रीज, प्रा.लि. मुंबई यांना प्रदान करण्यांत आले असून उर्वरीत रूपये 73,177/- एवढी लाभार्थी हिस्स्याची रक्कम देणे बाकी आहे. सदर रक्कम थकीत असण्यांचे कारण काय? खुलासा करावा.

2) लाभार्थी हिस्सा पंचायत समिती सेस फंडाला जमा केल्याबाबतच्या चलान लेखापरिक्षण तपासणीकरीता उपलब्ध झाल्या नाहीत.

3) सदर योजना सन 2015 मधील असून, ती सन 2016 व 2017 मध्ये राबविण्यांचे कारण काय? खुलासा करावा.

4) सौर कंदील प्राप्तीबाबत साठा नोंदवही, वाटपबाबत लाभार्थ्यांच्या पोचपावत्या, लाभार्थ्यांची निवड यादी, व लाभार्थ्यांची गावनिहाय मास्टर नोंदवही लेखापरीक्षणासाठी तपासणीकरीता उपलब्ध झाली नाही.

5) प्राप्त सौर कंदील हे तांत्रिकदृष्टया उत्तम असल्यांबाबतचे चाचणी अहवाल दप्तरी आढळले नाहीत.

6) एकुण 423 लाभार्थ्यांपैकी फक्त 237 लाभार्थ्यांच्या लाभार्थी हिस्साच्या रकमा जमा झाल्याचे दर्शविले आहे. उर्वरीत 186 लाभार्थ्यांच्या लाभार्थी हिस्स्याच्या रकमा जमा झाल्याचे स्पष्ट होत नाही. सदर 186 नग सौर कंदीलांचे वाटप होणे बाकी आहे किंवा कसे, यांबाबत साठा नोंदवही व वाटप नोंदवही अभावी पडताळणी करता आली नाही. वाटप होणे बाकी असल्यांस त्यांच्या गुणवत्ता कालावधीची जबाबदारी कुणाची?

7) उपरोक्त बाबींवरुन सदर योजनेची योग्य फलश्रृती झाल्याचे दिसून येत नाही.

**4.609 90 ट्क्के अनुदानावर शिलाई मशिन खरेदी योजना.**

**पंचायत समिती खामगाव, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** 90 ट्क्के अनुदानावर शिलाई मशिन खरेदी योजनेवर रक्कम रूपये 2,91,135/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेचा लाभ घेण्यासाठी नावे निश्चित केलेल्यापैकी काही अर्जदारांनी विलंबाने अर्ज सादर केलेले आहेत. अर्ज आवक केलेले नाहीत. सोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. उदा. सौ.प्रमीला राजेश बगाडे, रा.सुटाळा बु. (अर्ज आवक नोंदवहीला नोंदविलेला नाही.), कल्पना अमोल बगाडे याचा अर्ज जानेवारी-2017 रोजीचा आहे. जोती सुदामसीन्ग इंगळे याचा अर्ज मार्च-2015 म्हणजे योजना सुरु होण्याच्या अगोदरचा आहे. काही अर्जांवर गट विकास अधिकारी यांची सही नाही.

2) निविदा उघडण्यासाठी उपस्थितांची स्वाक्षरीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

3) शिलाई मशीन वाटप करण्यात आलेल्या महिलांना शिवण काम येत असल्याबाबत पुरावा जोडलेला नाही.

4) शिलाई मशीन प्राप्त झाल्यान्ंतर त्याचा उपयोग व्यावसाय सुरू करण्यास झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र संचिकेस आढळले नाही.

**4.610 90 ट्क्के अनुदानावर एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण योजना.**

**पंचायत समिती खामगाव, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण योजनेवर रक्कम रूपये 2,46,750/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेचा लाभ घेण्यासाठी नावे निश्चित केलेल्यापैकी काही अर्जदारांनी विलंबाने अर्ज सादर केलेले आहेत. अर्ज आवक नोंदवहीला नोंदविलेले नाही. उदा. शारदा काशिराम चिम, रा. निमकोहळा सोबत आवश्यक कागदपत्र जोडलेली नाहीत. योजनेसाठी उत्पन्न मर्यादा रुपये 50,000/- चे आत असताना जास्त उत्पन्न असलेल्या मुलींना प्रशिक्षण दिले. उदा. पल्लवी जगन्नाथ झिंगरे, रा. लांजुड यांचे उत्पन्न रुपये 90,000/- आहे.

**4.611 90 टक्के अनुदानावर पिकोफॉल शिवणयंत्र वाटपाबाबत.**

**पंचायत समिती काटोल, जिल्हा नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,80,000/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) साहित्य खरेदी करतेवेळी महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये 5,000/- वरील प्रत्येक खरेदीसाठी अधिकृत पुरवठाधारकाकडून 3 दरपत्रके मागवून खरेदी करणे आवश्यक आहे. परंतू, तशा प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे साहित्य योग्य किंमतीत वाजवी बाजार भावानुसार खरेदी झाल्याची खात्री पटत नाही.

2) योजनेच्या शर्ती अटी मध्ये लाभार्थाचे वार्षिक उत्पन्न रूपये 25,000/- पेक्षा जास्त नसावे, असे नमुद असतांना रूपये 25,000/- पेक्षा ज्यादा उत्पन्न असलेल्या 7 लाभार्थीस नियमबाहय लाभ दिलेला आहे.

3) नावांत बदल असतांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडण्यांत आलेले नाही. अनुक्रमांक 27 वनिता हरिभजन ढोले रा. खैरी व इतर दाखले. वनिता शिवानी खवसे या नावाने आहे. असे निवड यादीत बरेचसे लाभार्थी आहे.

4) उत्पन्नाचे दाखले नसतांना 4 लाभार्थ्यांना लाभ देणेत आला आहे.

5) अनुक्रमांक 15 निधी सुरेश सावरकर रा. जटामझरी यांचे डिप्लोमा साक्षांकित नसुन झेरॉक्स करून नांव लिहले आहे. यावरून संबंधीत लाभार्थीचे नांवे डिप्लोमा नसतांना नियमबाहय लाभ दिलेला आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/644 दिनांक 27/09/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापन करणे आवश्यक आहे.

**4.612 प्रवास भत्त्याची रक्कम रोखीने प्रदान करण्याबाबत.**

**पंचायत समिती भंडारा, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रूपये 5,73,421/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परीषद लेखा संहिता नियम 1968 च्या 25/2 नुसार रुपये 1000 पेक्षा अधिक रक्कम चेकद्वारे प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु, बालविकास प्रकल्प अधिकारी, भंडारा यांनी प्रवास भत्त्याची रक्कम चेकने प्रदान न करता रोखीने प्रदान केल्याचे दिसून येते.

**4.613 महिलांना शिलाई मशीन अनुदान वाटपाबाबत (ओ टी एस पी)**

**पंचायत समिती तुमसर, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदरबाबत 3 प्रमाणकांन्वये रक्कम रूपये 1,28,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत:-

1) लाभार्थ्याचे अर्ज लेखापरीक्षणास सादर करण्यांत आलेले नाहीत.

2) मंजूर अनुदान लेखापरीक्षण दिनांकापर्यन्त लाभार्थ्याचे बॅक खात्यांत जमा करण्यांत आले नसुन पंचायत समिती स्तरावर प्रलंबित असल्याने योजनेचा / शासनाचा उद्देश सफल झाले, असे म्हणता येत नाही

3) एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिला जाणार नाही, याबाबतची दक्षता घेण्याबाबत मास्टर नोंदवही ठेवण आवश्यक असतांना मास्टर नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्रमाविकास विभाग व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 466/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनांची अंमलबजावणी विहीत वेळापत्रकानुसार करणे आवश्यक असतांना अशी अंमलबजावणी योजना राबवितांना केली नाही.

5) खरेदी केलेल्या साहित्याची पर्यवेक्षकाकडून प्रत्यक्षांत तपासणी करून त्याबाबतचा तपासणी अहवाल विभागास सादर करावयाचा असून पर्यवेक्षकांनी सादर केलेल्या तपासणी अहवालाची तपासणी केली असता अ) तपासणी कोणत्या दिनांकास करण्यांत आली, याबाबत तपासणी अहवालावर दिनांक नमुद करण्यांत आला नाही व सदर तपासणी अहवाल कार्यालयात केव्हा सादर करण्यांत आला, त्याबाबत कार्यालयाचा आवक क्रमांक नाही व अधिका-यांनी त्यावर आपला शेरा नोंदविलेला नाही.

**4.614 पंचायत समिती सेस अंतर्गत 100 टक्के अनुदानावर शिवणयंत्र (शिलाई मशीन) पुरविणेबाबतची अनियमितता.**

**पंचायत समिती तिरोडा, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 53,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 तसेच शासन निर्णय दिनांक 17/01/2001 अन्वये जिल्हा परिषदेकडील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्याबाबतचे वेळापत्रक असून, त्याचे पालन करण्यात येत नसल्याचे दिसून येते.

2) सदर योजनेत उपरोक्त नमुद शासन निर्णयाप्रमाणे लाभार्थ्यांची निवड यादी पंचायत समितीच्या सभेत ठेवण्यात येऊन त्यास ठरावान्वये सर्वानुमते निवड यादीस मंजुरी केलेली नाही व त्याबाबत ठरावात मंजुर लाभार्थी संख्या सुध्दा नमुद करण्यात आल्याबाबत मंजुरीचा ठराव सादर करण्यात आलेला नाही.

3) 14 नग शिलाई मशीन खरेदीचे बिलानुसार एकूण रुपये 61,600/- देय ठरत आहे. त्याबाबत असे की, सदर योजनेची तरतुद रुपये 53,000/- असतांना 14 नग शिलाई मशीन प्रति नग रुपये 4,400/- प्रमाणे खरेदी करण्यात आल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात पुरवठादारास प्रदान देयकानुसार रुपये 53,000/- मध्ये 12 नग शिलाई मशीन खरेदी केल्या जाऊ शकते. त्यावरुन असे निदर्शनास येते की, प्राप्त दरपत्रकात जरी नमन एण्टरप्रायजेस, गोंदिया यांचे शिलाई मशिनचे दर रुपये 4,400/- कमी आढळले असले, तरी सदर साहित्याचा बाजार भाव कमी आढळला जाऊ शकतो. तसेच डिलव्हरी मेमो सादर न केल्याने प्रत्यक्षात किती साहित्य प्राप्त झाले? याबाबत माहिती होत नाही. तरी सदर शिलाई मशिनचे दर बाजारभावप्रमाणे असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र घेणे व प्रत्यक्षात किती साहित्य प्राप्त करण्यात आले? हयाबाबत सुध्दा तपासणे आवश्यक आहे. त्यात सदर साहित्याचे दर बाजारभावपेक्षा जादा आढळल्यास, सदर तफावतीची रक्कम संबंधिताकडून वसुल होणे आवश्यक आहे.

4) साठा पुस्तकातची तपासणी केली असता पान क्रमांक 111 वर फक्त दोन लाभार्थ्यांना वाटप केल्याचे नमुद आहे. परंतु, सदर लाभार्थ्यांचे अर्ज व त्याचे इतर संबंधित दस्ताऐवज लेखापरिक्षण कालावधीत सादर करण्यात आले नाही. तसेच लाभार्थी निवड यादी व वाटप नोंदविण्यात आला नसतांना 12 नग शिलाई मशीन खरेदी केल्यामुळे एकूण रुपये 45,429/- निष्फळ खर्च करण्यात आल्याचे दिसून येते.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1968 चे नियम 87 अनुसार साहीत्याची तांत्रिक तपासणी/ चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे स्पेसिफिकेशन नुसार शिलाई मशिन प्राप्त झाल्याची शहानिशा करता आली नाही.

6) सदर साहित्य प्राप्त केल्याबाबत डिलीव्हरी मेमो सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे देयकात नमुद केल्याप्रमाणे साहित्य घेण्यात आले किंवा नाही, याबाबत शहानिशा करता येत नाही. तसेच जिल्हा स्तरावरुन सदर शिलाई मशिनबाबत शासकीय दरकरार नसल्याबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

7) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- मागास 1089/ प्र.क्र.565/34, दिनांक 05/10/1989 तथा दिनांक 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू, ती लेखापरिक्षणाकरिता सादर करण्यात न आल्याने एकाच व्यक्तीस दुबार लाभ मिळू शकतो.

8) सदर साहित्य लाभार्थीस प्राप्त झाल्याचे व ते त्याचा उपयोग करीत असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र/ मुल्यमापन अहवाल सादर करण्यात आले नाही.

**4.615 TSP योजनेअंतर्गत अनुदान तत्वावर बैलगाडी वाटपातील अनियमितता**

**पंचायत समिती सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,30,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अनुसूचीत जाती उपाययोजना अंतर्गत शेतकऱ्यांना कृषी विकासासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील मार्गदर्शक नुसार लाभार्थींची निवड

परिच्छेद 2(2.1) मधील निकषाप्रमाणे दारीद्र रेषेखालील शेतकऱ्याशिवाय अन्य 6 हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन धारकाची निवड योजनेकरीता केली असल्याबाबत दर्शविण्यात यावे.

2) पुरवठादारधारकानी साहित्याचा पुरवठा स्पेसिफीकेशनमधे नमुद तपशिलानुसार साहित्य मापदंडानिशी पुरवठा केलेली असल्याबाबतचा बैलगाडी तांत्रिकदृष्या योग्य असल्याबाबत शासकीय गुणनियंत्रण तपासणी मानक संस्थाकडून करून अहवाल सादर केलेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील 83(3) प्रमाणे साहित्याचा दर्जा व योग्यता बाबत विभाग प्रमुखाची तपासणी करून साहित्य योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाले असल्याबाबतचे प्रमाणपत्र नस्तीसोबत तपासणीस उपलब्ध झाले नाही.

4) लेखासंहीता नियम नोंदवही नमुना - 33 साठा पुस्तीकेत साहित्याचा साठा नोंद घेणे आवश्यक असताना साठा नोंद घेण्यात आलेला नाही व साहित्याचा वाटप दर्शविण्यात आले नाही.

5) या योजनेसाठी अनुदानाची मर्यादा रूपये 15,000/- असुन लोखंडी बैलगाडीची किंमत रूपये 16,800/- नस्ती वरून समजते. तर जादाची रक्कम रूपये 1,800/- लाभार्थी हिस्सा धरून खरेदी केल्याचे आढळले. परंतु रूपये 1,800/- लाभार्थ्याकडून प्राप्त करून घेतल्याचा अभिलेख उपलब्ध झालेला नाही.

6) लोखंडी बैलगाडी महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळ यांचे कडून खरेदी करण्यात आलेली आहे. खरेदी केलेल्या लोखंडी बैलगाडीवर परिशिष्ट 5 मार्गदर्शक सुचनानुसार बैलगाडीचा पुरवठा केल्यानंतर बैलगाडीच्या दर्शनी भागवर योजनेचे नाव व पुरवठा केल्याचा वर्ष, 3*2 इंच आकाराचे पत्र्याचे लेबल लावावे अथवा लाकुड असलेल्या भागात तपशिल कोरून घ्यावे. असे असताना खरेदी केलेल्या लोखंडी बैलगाडीवर मार्गदर्शक सुचनेप्रमाणे लेबल लावले असल्याबाबत छायाप्रत तपासणीस उपलब्ध झाले नाही.

7) विवरणपत्रात 42 लाभार्थ्याला 42 नग बैलगाडी वाटप केल्याचा एकूण खर्च 6,30,000/- झाल्याबाबत नमुद आहे. परंतु, खर्चाचे प्रमानक रक्कम रूपये 6,15,000/- तपासणीस आढळले. रूपये 15,000/- प्रमाणक नाही. सदर खर्चाचे प्रमाणकाबाबत खुलासा व्हावा.

**4.616 आदिवासी उपयोजना अंतर्गत 100 टक्के अनुदान तत्वावर वैलजोडी वाटप खर्चातील अनियमीतता**

**पंचायत समिती धानोरा, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** आदिवासी उपयोजना अंतर्गत 100 टक्के अनुदानावर सन 2015-2016 मधील 5 लाभार्थी व सन 2016-2017 मधील 162 लाभार्थी, असे एकूण 167 लाभार्थ्यांना बैलजोडीचा लाभ दिल्याबाबत रक्कम रूपये 50,10,000/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबवित असतांना अंतरीम मार्गदर्शक सुचना यातील परिशिष्ट 3 मधील सुचनेप्रमाणे लाभार्थी निवड समिती यातील नमुद बाबीनुसार लाभार्थीची निवड प्रक्रीया करण्यात आली नाही.

2) जिल्ह्याबाहेरील बैलजोडी खरेदी केलेली आहे. असे असतांना जिल्ह्याबाहेरील खरेदी करण्याबाबत संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांचे आदेश प्राप्त करून घेतलेला नाही.

3) पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

4) लाभार्थीचा बैलजोडी समवेत पोस्टकार्ड साईजचा फोटो काढावा व सदर फोटोला संबंधीत बैलजोडी खरेदी कमेटी यांचेकडून प्रमाणित करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) लाभार्थी निवडबाबत मस्टर नोंदवही पंचायत समितीने ठेवलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला अनेक वेळा लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) सदर लाभधारक शेतकऱ्याकडे सद्या बैलजोडी / रेडेजोडी नसल्याचे ग्रामसेवक यांचे प्रमाणपत्र नाही.

7) लाभ घेतलेले लाभार्थी त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेले पशुवैद्यकीय दवाखान्यातील जनावरांची पंची नोंदवहीत बैलजोडीची टॅग नंबरसह नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र संबंधीत पशुवैद्यकीय अधिकारी/ पशुधन पर्यवेक्षक यांचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

8) सदर योजना दर वर्षाला राबविली जाते व योजनेचा उद्देश - आदिवासी शेतकऱ्याचे कृषी उत्पादन वाढीस सहाय्य करून त्याच्या आर्थिक उन्नतीस मदत करणे असे असतांना 2015-2016 मध्ये ज्या लाभार्थ्यांनी लाभ घेतलेले आहेत, त्या लाभार्थ्यांकडून फलश्रृती अहवाल संबंधीत विभागाने घेतलेला नाही त्यामुले सदर योजनेमुळे लाभार्थी शेतकऱ्याचे त्याच्या आर्थिक उन्नती झाल्याबाबत व योजनेचा उद्देश सफल झाल्याबाबत अभिप्राय देता येत नाही.

**4.617 पंचायत समिती उपकरातून सर्व साधारण महिलांना 100 टक्के अनुदानावर पिको फॉल मशीन वाटपातील अनियमितते बाबत.**

**पंचायत समिती पैठण, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 02 दिनांक 18/10/2016 अन्वये रक्कम रुपये 6,91,449/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती पैठणचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकरातून सर्व साधारण महिलांना 100 टक्के अनुदानावर पिको फॉल मशीन पुरविणेपोटी उपरोक्त प्रमाणकान्वये एकूण 69 लाभार्थ्यांना प्रत्येकी रुपये 10,021/- प्रमाणे एकूण रुपये 6,91,449/- एवढा खर्च नोंदवला आहे. तथापि, सदर खर्चासंबधी संचिका / अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 2011 चे कलम 06 नुसार लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देणे ही, स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे. तथापि, उपरोक्त खर्चाबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत.

**4.618 पंचायत समिती उपकरातून 100 टक्के अनुदानावर शिलाई मशीन खरेदीकरणे बाबत.**

**पंचायत समिती सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती सिल्लोडचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी प्रमाणक क्रमांक 02 माहे नोव्हेंबर 2016 अन्वये रुपये 5,28,168/- एवढा खर्च 100 टक्के अनुदानावर महिला व बालकल्याणार्थ या बाबींवर नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 नुसार रुपये 3 लक्ष पेक्षा अधिक खरेदीसाठी ई-निविदा मागविणे आवश्यक असतांना पंचायत समिती, सिल्लोड यांनी मागविलेल्या ई-निविदे आधारे खरेदी करण्यात आलेली आहे.

2) उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 3.1.2.5 नुसार किंमतीचा वाजवीपणा निश्चित करण्यासाठी यापूर्वीच्या करारामधील किंमतीची सांख्यिकी माहिती (Database), बाजारात त्या उत्पादनाची उपलब्ध असलेली किंमत याचा आधार घेण्याचे निर्देश असतांना दराबाबत अशा प्रकारे शहानिशा केलेली दिसून येत नाही.

3) पंचायत समिती, सिल्लोड यांनी मागविलेल्या ई-निविदा प्रक्रियेचे अवलोकन केले असता प्राप्त 04 निविदांपैकी व्यंकटेश ॲग्रो इंजिनियरिंग, जालना यांची निविदा नाकारली आहे. तथापि, निविदा नाकारण्याचे सबळ कारणे संचिकेत निदर्शनास आली नाहीत.

4) संबंधितास पुरवठा आदेश दिनांक 22/09/2016 रोजी देण्यात आले होते व मुदत 15 दिवसांची होती. तथापि, साहित्य दिनांक 16/10/2016 रोजी म्हणजे तब्बल 10 दिवस विलंबाने प्राप्त होवूनही पुरवठादारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 05 नुसार 90 टक्के अदाई करणे आवश्यक असतांना 100 टक्के अदाई करण्यात आलेली आहे.

**4.619 पंचायत समिती उपकरातून 90 टक्के अनुदानावर महिला बालकल्याण योजनेतंर्गत पिको फॉल मशीन व मिक्सर ग्राईंडर खरेदीबाबत.**

**पंचायत समिती घनसावंगी, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** अ) पिको फॉल मशीन खरेदी प्रमाणक क्रमांक 2 माहे जुलै 2016 रुपये 2,69,325/- उपप्रमाण क्रमांक 91 दिनांक 01/07/2016 35 नग @ रूपये 8,550/- प्रमाणे.

ब) मिक्सर ग्राईंडर खरेदी प्रमाणक क्रमांक 4 माहे जुलै 2016 रुपये 2,68,920/-. सदरबाबत एकुण रक्कम रुपये 5,38,245/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती लेखापरीक्षणात उपलब्ध अभिलेख्यांची पडताळणी करतांना संचिकेत टिप्पणी लिहलेली नसल्याचे आढळून आले.

2) वरीलप्रमाणे सर्व साहित्य एकाच खरेदीदाराकडून खरेदी केले आहे. याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण /2010/प्र.क्र./72/परा 7, दिनांक 19/10/2011 अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील बांधकाम व साहित्य पुरविणेबाबतची ईटेंडरींग प्रक्रीयेतून करणेबाबत आदेशीत असतांना अशी कार्यवाही केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/106/प्र.क्र.78/5, दिनांक 09/01/1997 नूसार योजना राबविण्यापूर्वी लाभार्थींची निवड करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

4) संबंधित लाभार्थ्यांकडून 10 टक्के लोकवर्गणी लाभार्थी हिस्सा वसूल झाल्याबाबत सामान्य पावत्या दिलेल्या नाहीत. तसेच 10 टक्के लोकवर्गणी लाभार्थ्यांना साहित्य प्राप्त झाल्यानंतर पुरवठाधारकास अदा करण्यात येईल, असे करारनाम्यामध्ये नमूद आहे. परंतू, सदरील 10 टक्के रक्कम पुरवठादाराला कधी अदा केली, याबाबत संचिकेत अभिलेखे दिसून आले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1093/1030/14, दिनांक 01/01/1993 नूसार मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामूळे लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला नसलेबाबत खात्री करता आली नाही.

6) तांत्रिक मान्यतेमधील अटी व शर्तीनूसार अ) लाभार्थी ही महिला असावी. ब) तालुक्यातंर्गत असावी. क) तलाठी उत्पन्न प्रमाणपत्र असावे. ड) ग्रामसेवक रहिवासी प्रमाणपत्र असावे इ) 10 टक्के लोकवर्गणी साहित्य वाटप करतांना घ्यावी, असे नमूद असतांना उपरोक्त बाबी संचिकेत अवलोकन करतांना अपूर्ण आढळून आल्या.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्र.क्र. 1239/34, दिनांक जानेवारी 1993 नूसार वाटप साहित्याची गट विकास अधिकारी/ सक्षम अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन फलश्रुतीबाबत अहवाल तयार करण्यात आलेला नाही.

8) उपरोक्त साहित्य खरेदीबाबत शासन दर करार असलेबाबत चौकशी न करता स्थानिकरीत्या खरेदी केले आहे.

**4.620 बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयातील स्टेशनरी खरेदी व कार्यालयीन खर्चामधील अनियमितता**

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रमाणक क्रमांक 37 - 31/03/17 अन्वये रक्कम रुपये 54,780/- स्टेशनरी खरेदी व कार्यालयीन खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील सर्व उपप्रमाणकांमध्ये एक सारख्याच वस्तु खरेदी केल्या असुन उपप्रमाणके देखील एकसमान आहेत. नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये कोणत्याही मागणीचा उल्लेख आलेला नाही. त्याचप्रमाणे सदर कार्यालयास कार्यालयीन लिपीक पद एकच असताना कॅल्क्युलेटर 11 नग, पंचींग मशीन 11 नग, स्टॅपलर 11 नग, टोचा 11 नग खरेदी अनावश्यक असुन प्राप्त अनुदान खर्ची घालण्याच्या उद्देशाने बनावट देयके तयार केल्याचे

उपप्रमाणकांवरुन दिसुन येते. यावरुन प्रत्येकी 10 नगांची अनावश्यक खरेदी एकुण रक्कम रुपये 10,900/- वसुलीस पात्र ठरते.

अर्धसमास पत्र क्रमांक 71, दिनांक 15/09/2017 अन्वये मागणी करुनही सदर साहीत्य वाटप साठा नोंदवही देखील लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही. त्यामुळे वस्तुंची खरेदी न होताच देयक आहरीत करण्यात आल्याचे दिसुन येते.

सदर उपप्रमाणके महाराष्ट्र शासन, उद्योग, कामगार व उर्जा विभाग, शासन निर्णय भाखंस 2588/ प्र.क्र. - 2512 / उद्योग-6, दिनांक 02/01/1992 व शासन निर्णय दिनांक 30/10/2015 अन्वये खरेदी प्रक्रिया टाळण्याच्या उद्देशाने तुकडे पाडुन खरेदी करण्यात आली आहे.

2) जिल्हा परिषदेच्या वित्त विभागामार्फत सर्व पंचायत समिती व विविध विभागांना सर्व स्टेशनरी पुरविली जाते. तरी विभागाने त्यांच्याकडे वार्षिक मागणीपत्र देऊन स्टेशनरी उपलब्ध करुन घेणे आवश्यक असतांना तसे न करता स्थानिकरित्या खरेदी केलेली आहे. सदर खरेदी आवश्यक असल्याबाबत कार्यालयातील संबंधिताकडुन मागणी नोंदविलेली नसतांना व सदर खरेदीसाठी स्पर्धात्मक दरपत्रके न मागविताच खरेदी केलेली आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 80 नुसार सदर खर्चासाठी विहित नोंदवही नमुना नंबर 30 मध्ये नोंदी घेतल्याचे आढळुन आले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 नुसार साहित्य चांगल्या स्थितीत मिळाल्याचे प्रमाणपत्र देयकावर नोंदविलेले नाहीत.

**4.621 पंचायत समिती उपकरातून महिला व बालकल्याण अंतर्गत D.B.T. तत्वावर शिलाई मशिन पुरवठ्यामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती परभणी, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, परभणीच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात पंचायत समितीने 50 टक्के वाढीव उपकरातून महिला व बालकल्याण या लेखाशिर्षां अंतर्गत शिलाई मशिन पुरवठा करणेसाठी रक्कम रूपये 5,00,000/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील सूचना क्रमांक 16 अन्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य लाभार्थी मिळविण्याच्या अनुषंगाने पुरेशी व व्यापक प्रसिद्धी देवून प्रथम अर्ज मागवून त्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील पात्र महिलांना या योजनेचा प्राधान्याने लाभ द्यावा. दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात न सापडल्यास रूपये 50]000/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थींना या योजनेचा लाभ देण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश असताना पंचायत समितीने अशी कार्यपद्धती न अवलंबिता सरसकट लाभार्थी निवडून त्यांना शिलाई मशीनचे वाटप केल्याचे दिसून आले.

2) या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव अर्जासोबत अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. त्या अटी व शर्तीमधील अनुक्रमांक 6 नुसार या योजने अंतर्गत शिलाई मशीनचा लाभ घेण्यासाठी सदरील लाभार्थींच्या प्रस्तावासोबत संलग्न करण्यांत आलेले कागदपत्रे यांची तपासणी केली असता (1) अर्जासोबत शासन मान्यता प्राप्त अथवा शासन अंगीकृत मान्यता प्राप्त संस्था यांचे शिलाई मशिन चालविण्यांचे प्रशिक्षण पुर्ण केल्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडलेले नाही (2) कांही लाभार्थींनी खाजगी टेलरचे व ग्रामपंचायत कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र जोडलेले आहे. (3) कांही लाभार्थींनी अर्जासोबत प्रमाणपत्र जोडलेले नाही. (4) कांही ठराविक खाजगी संस्थांची अनुभव प्रमाणपत्रे अनेक अर्जासोबत जोडलेली आहेत. याबाबत सांशकता निर्माण होते. त्यामुळे योग्य लाभार्थींची निवड झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे केलेली निवड प्रक्रिया ही वित्तीय औचीत्यास अनुसरून नसून सदर बाब महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयाचे उल्लंघन करणारी आहे.

3) प्रत्यक्षात साहित्य खरेदी केले असल्याची गट विकास अधिकारी यांनी पाहणी करुन व सदरील लाभार्थी यांना सदरील साहित्यपासून जीवनमान उंचावणेकरीता आर्थीक मदत झाल्याविषयीचा फलश्रुती अहवाल अनुपालनासह सादर करण्यांत यावा.

4) या योजनेच्या अटी व शर्तीमधील अट क्रमांक 4 नुसार रूपये 100/- च्या मुद्रांक शुल्कावर लाभार्थींनी यापूर्वी लाभ घेतला नसल्याचे व शिलाई मशिन प्राप्त झाल्यास त्याचा दुरुपयोग न करण्याबाबतचा करारनामा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक 5 नुसार ग्रामसभेच्या लाभार्थी निवडी बाबत ठरावाची मूळ प्रत अर्जासोबत जोडावी, असे नमुद आहे. तथापि, मंजूर 133 लाभार्थींच्या अर्जासोबत अशाप्रकारची कागदपत्रे जोडलेली नाहीत.

5) एकाच लाभार्थ्यास शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसलेबाबतची पडताळणी करण्यासाठी पंचायत समितीने लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

6) 10 लाभार्थींचे प्रस्ताव तपासणीकरीता उपलब्ध करण्यांत आले नसल्यामुळे सदरील रक्कम संबंधित तथा जबाबदार व्यक्तीकडून वसुल करुन पंचायत समिती उपकरात भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

7) सदर योजना राबविल्यामुळे प्रस्तावनेत नमूद केलेले योजनेचे उदिष्ट्य साध्य झालेबाबत व योजना यशस्वी झालेबाबत गटविकास अधिकारी यांनी पाहणी करून उपयोगिता प्रमाणपत्र देणे आवश्यक होते. तथापि, अशा प्रकारची पाहणी/तपासणी करून अहवाल प्राप्त केलेला नाही.

**4.622 पंचायत समिती उपकरातून महिला व बालकल्याण अंतर्गत शिलाई मशिन खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती गंगाखेड, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती गंगाखेडच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात पंचायत समितीने 50 टक्के वाढीव उपकरातून महिला व बालकल्याण या लेखाशिर्षा अंतर्गत शिलाई मशिन खरेदीवर रक्कम रुपये 4,20,000/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 126 अन्वये शिलाई मशिन खरेदी प्रतिनग रूपये 3,150/- या दरास पंचायत समितीने मान्यता दिलेबाबतचा ठराव दिसून आलेला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील सूचना क्रमांक 16 अन्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य लाभार्थी मिळविण्याच्या अनुषंगाने पुरेशी व व्यापक प्रसिद्धी देवून प्रथम अर्ज मागवून त्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील पात्र महिलांना या योजनेचा प्राथम्याने लाभ द्यावा. जर दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात न सापडल्यास रुपये 50,000/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थींना या योजनेचा लाभ देण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश असताना पंचायत समितीने अशी कार्यपद्धती न अवलंबिता सरसकट लाभार्थी निवडून त्यांना शिलाई मशीनचे वाटप केल्याचे दिसून आले.

3) निविदा मंजूर झाल्यास निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे विश्वनाथ टेक्सटाईल्स & गारमेंट्स, गंगाखेड यांचेकडून रुपये 100/- च्या मुद्रांकावर करारनामा करून घेणे आवश्यक होते. तथापि, असा करारनामा न करताच नियमबाहय साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश दिलेले आहेत, ही बाब नियमबाहय आहे. तसेच करारनामा न घेतल्याने रुपये 100/- च्या मुद्रांक शुल्काच्या नुकसानीची रक्कम सबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

4) विश्वनाथ टेक्सटाईल्स & गारमेंट्स, गंगाखेड यांनी 133 नग शिलाई मशिनचे प्रती नग रुपये 3,150/- प्रमाणे रुपये 4,20,000/- चे देयक सादर केलेले आहे. तसेच पंचायत समितीने त्यांना या देयकाप्रमाणे रुपये 4,20,000/- रक्कम प्रदान केलेली आहे. परंतु, 133 नग शिलाई मशिनचे रुपये 3,150/- प्रमाणे रूपये 4,18,950/- रक्कम येते. त्यामुळे रुपये 1,050/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदान रक्कम रूपये1,050/- वसूल करणे आवश्यक आहे.

5) मंजूर केलेले 133 लाभार्थ्यांचे प्रस्ताव अर्ज तपासले असता त्या अर्जावर- “प्रस्तावाची प्रस्तुत पंचायत समिती स्तरावर तपासणी करण्यात आली असून आवश्यक त्या सर्व अटी अर्जदार पूर्ण करीत असल्यामुळे अर्जदाराचा प्रस्ताव परिपूर्ण असून सदर प्रस्तावाची पंचायत समिती स्तरावरून निवडीसाठी शिफारस करण्यात येत असल्याबाबतच्या” गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या एकाही अर्जावर दिसून आल्या नाहीत. तसेच 40 जणांचे अर्ज हे परिपूर्ण नसून अर्जदार हे त्यातील अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्याचे दिसून आले. तेंव्हा या मंजूर प्रस्ताव अर्जांची छाननी सबंधित कर्मचारी व गटविकास अधिकारी यांनी कोणत्या आधारे केली, याचा उलगडा लेखापरीक्षणात कळू शकला नाही.

6) (i) या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव अर्जासोबत अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. त्या अटी व शर्तीमधील अनुक्रमांक 6 नुसार या योजने अंतर्गत शिलाई मशीनचा लाभ घेण्यासाठी लाभार्थीकडे शासनमान्य संस्थेकडे शिलाई मशिन चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. परंतु, 108 लाभार्थींचे मंजूर प्रस्ताव अर्ज तपासले असता, त्या अर्जासोबत शासनमान्य संस्थेकडे शिलाई मशिन चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यांनी प्रशिक्षण प्रमाणपत्र न जोडता अनुभव प्रमाणपत्र जोडलेले आहे. जे नियमबाह्य आहे. तसेच कांही लाभार्थींनी खाजगी टेलरचे व ग्रामपंचायत कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र जोडलेले आहे. तर कांही लाभार्थींनी अर्जासोबत प्रमाणपत्र जोडलेले नाही आणि ज्या कांही ठराविक खाजगी संस्थांची अनुभव प्रमाणपत्रे जोडलेली आहेत, त्याबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे योग्य लाभार्थींची निवड झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे केलेली निवड प्रक्रिया ही वित्तीय औचीत्यास अनुसरून नसून सदर बाब महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयाचे उल्लंघन करणारी आहे.

(ii) तसेच खालील विवरण पत्रातील अनुक्रमांक 1, 3, 18, 19, 35, 50, 62, 78, 83, 84, 85 व 88 मधील लाभार्थ्यांचे सन 2016 रोजी वय 51 वर्ष व त्यापेक्षा जास्त असल्याचे दिसून आले. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना या वयात लाभ दिल्याने ते लाभार्थी खरोखरच सक्षम झालीत का? याचा बोध लेखापरीक्षणात होत नाही.

उक्त या सर्व बाबी पाहता 108 लाभार्थ्यांची निवड अवैध ठरते. तरी 108 लाभार्थीकडून रूपये 3,150/- प्रमाणे रूपये 3,40,200/- रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

7) सदर योजना ही पंचायत समिती उपकरातून 10 टक्के महिला व बालकल्याण या लेखाशिर्षा अंतर्गत राबविलेली आहे. तेंव्हा या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील महिलांनाच देणे आवश्यक होते. परंतु, पंचायत समितीने पाच पुरुषांचे शिलाई मशिनबाबतचे प्रस्ताव स्विकारून त्यास सर्वसाधारण सभेत मंजुरी घेऊन तसेच गटविकास अधिकारी यांनी प्रस्ताव मंजूर करून त्यांना नियमबाह्यरीत्या या योजनेचा लाभ प्रदान केलेला आहे. यावरून स्पष्ट होते की, सबंधित कर्मचारी यांनी कसलीही शहानिशा न करता चुकीचे प्रस्ताव वरिष्ठांना सादर केले. त्यामुळे चुकीची योजना राबविली गेल्याचे स्पष्ट होते. तरी याबाबत सबंधीतावर कार्यवाही होणे अपेक्षित आहे. तेंव्हा नियमबाह्य प्रदान केलेली रक्कम रूपये15,750/- संबंधित कर्मचाऱ्याकडून वसूल होणे आवश्यक आहे.

8) या योजनेच्या अटी व शर्तीमधील अट क्रमांक 4 नुसार रूपये100/-च्या मुद्रांक शुल्कावर लाभार्थींनी यापूर्वी लाभ घेतला नसल्याचे व शिलाई मशिन प्राप्त झाल्यास त्याचा दुरुपयोग न करण्याबाबतचा करारनामा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक 5 - ग्रामसभेच्या लाभार्थी निवडीबाबत ठरावाची मूळ प्रत अर्जासोबत जोडावी. तथापि, मंजूर 133 लाभार्थींच्या अर्जासोबत अशाप्रकारची कागदपत्रे जोडलेली नाहीत.

9) एकाच लाभार्थ्यास शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसलेबाबतची पडताळणी करण्यासाठी पंचायत समितीने लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

10) सदर योजना राबविल्यामुळे प्रस्तावनेत नमूद केलेले योजनेचे उदिष्ठ साध्य झालेबाबत व योजना यशस्वी झालेबाबत गटविकास अधिकारी यांनी पाहणी करून उपयोगिता प्रमाणपत्र देणे आवश्यक होते. तथापि, अशा प्रकारची पाहणी/तपासणी करून अहवाल प्राप्त केलेला नाही.

11) एकंदरीत या सर्व बाबींचा परामर्श घेतला असता सदरील योजनेचा महिलांना किती व कसा लाभ झाला, याची फलश्रुती योजनेच्या उद्दिष्ठानुसार झालेली नसल्याचे स्पष्ट होते योजना नियोजनबध्दरीतीने कार्यान्वित न करणे व योग्य लाभार्थ्यांना लाभ न मिळाल्याने या योजनेचा उदात्त हेतू साध्य होण्यास पंचायत समितीची यंत्रणा अकार्यक्षम ठरल्याचे स्पष्ट होते.

**4.623 पंचायत समिती उपकरमधून महिलांना शिलाई मशीन वाटप केलेल्या कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती मानवत, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, मानवतचे सन 2016-2017 या कालावधीचे लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकरमधून महिला व बालकल्याण लेखाशिर्षातंर्गत प्रमाणक क्रमांक 1 दिनांक 02/11/2016 अन्वये रक्कम रूपये 2,20,150/- शिलाई मशीन खरेदी करणेसाठी खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने पत्र दिनांक 03/09/2016 अन्वये शिलाई मशीन खरेदी करण्यासाठीची दरपत्रके मागविणारी नोटीस कोणत्याही वृतपत्रात प्रसिध्द केली नाही. तसेच कोणत्याही स्थानिक व नोंदणीकृत पुरवठाधारकांस नोटिस दिल्याची पोच केली नाही. तर परभणी जिल्हयाबाहेरील श्री स्वामी समर्थ मशिनरी ॲण्ड इले., वसमत, जिल्हा हिंगोली या ठेकेदारास खरेदीची माहिती मिळुन दरपत्रके कशी सादर केली, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) दरपत्रकान्वये खरेदी करावयाची शिलाई मशीनची किंमत ही, बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.

3) श्री स्वामी समर्थ मशिनरी ॲण्ड इले., वसमत, जिल्हा हिंगोली हे शिलाई मशीनचे अधिकृत विक्रेते असल्याबाबत व त्यांचे नोंदणीचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. तसेच शिलाई मशीन पुरवठाचे डिलीव्हरी चलनवर व बीजक क्रमांक 28 वर तारीख नमुद नाही व साहित्य प्राप्तीबाबत गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच केव्हा प्राप्त झाले, याचीही नोंद नाही.

4) शिलाई मशीन वाटपासाठीचे लाभार्थ्याचे अर्जाची तपासणी केली असता खालीलप्रमाणे तपशील आहेः-

1 ते 37 लाभार्थ्याचे उत्पन्न प्रमाणपत्र तहसीलदारांनी निर्गमित केलेले घेण्यात आले नाहीत. तसेच अनक्रमांक 37 व 38 वरील लाभार्थ्याकडुन हिस्स्याची रक्कम घेण्यात आलेली नाही व त्यांना शिलाई मशीन अद्याप वाटप केलेली नाही. अनुक्रमांक 1 ते 26 व 29 ते 37 वरील लाभार्थ्याकडुन घेणेत आलेला बॉण्डवर गटविकास अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. तसेच अनुक्रमांक 27 व 28 वरील लाभार्थ्याकडुन बॉण्ड घेण्यात आलेले नाहीत. अनुक्रमांक 6, 8, 26 वरील लाभार्थ्याचे बॉण्डवर लाभार्थ्याच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

5) शिलाई मशीन वाटपाचा लाभ देणेसाठी लाभार्थ्याकडुन हिस्स्याची रक्कम ही, शिलाई मशीन खरेदी करण्यापुर्वी जमा करुन घेण्यात आली नाही. ती उपरोक्त तपशीलानुसार जमा करुन घेण्यात आली. तसेच अनुक्रमांक 36 व 37 वरील लाभार्थ्याकडुन हिस्स्याची रक्कम अद्याप जमा करुन घेतलेली नाही.

6) लाभार्थ्याकडुन जमा होणारी हिस्स्याची रक्कम ही, पंचायत समिती उपकर खात्यात जमा न करता अप्रशासन खात्यात जमा करण्यात आली असुन पंचायत समिती उपकरातुन रूपये 2.00 लक्ष खर्च करणेस मंजुरी असतांना रूपये 2,20,150/- खर्च करण्यात आला आहे.

7) सदर खरेदी प्रक्रीयेबाबत पंचायत समिती स्तरावरील सर्वसाधारण सभेत सदरची कार्यवाही सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणेत आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील सुचना क्रमांक 16 नुसार सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य लाभार्थी मिळविण्याचे अनुषंगाने पूरेशी व व्यापक प्रसिध्दी देऊन प्रथम अर्ज मागवुन त्यातील दारिद्रय रेषेखालील कुंटुबातील पात्र महिलांना या योजनेचा लाभ द्यावा. जर दारिद्रय रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात न उपलब्ध झाल्यासच, रूपये 50,000/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिलांना या योजनेचा लाभ देण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश असतांना पंचायत समितीने अशी कार्यपध्दतीचा अवलंब न करता लाभार्थ्याना शिलाई मशीन मंजुर केल्या आहेत.

9) एकाच लाभार्थ्यास शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरुन दुबार लाभ मिळाले नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी पंचायत समितीने लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु, अशा प्रकारची नोंदवही ठेवलेली नाही.

10) सदर योजना राबविल्यामुळे प्रस्तावनेत नमुद केलेले योजनेचे उद्दिष्ट साध्य झालेबाबत व योजना यशस्वी झालेबाबत गटविकास अधिकारी यांनी पाहणी करुन उपयोगिता प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. तथापि, अशा प्रकारची पाहणी/तपासणी करुन अहवाल प्राप्त केलेला नाही.

**4.624 महिला व बाल कल्याण अंतर्गत 100 टक्के अनूदानावर मिक्सर ग्राइंडर खरेदी करणे बाबत.**

**पंचायत समिती औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती औढा ना.सन 2016-2017 या वर्षात पंचायत समिती उपकरातुन महिला व बालकल्याण योजने अंतर्गत100 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील महिला करीता मिक्सर ग्राइंडर पुरवठा करणे योजनेवर रक्कम रुपये 1,94,325/- खर्च नोंदवलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 126 नुसार दरास मान्यता घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परीपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार योजना राबवण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

3) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्रक्र -76/पं.रा.-1, दिनांक 24/01/2014 नूसार एकूण निधीपैकी 50 टक्के निधी गट अ तर 50 टक्के निधी गट ब योजनांवर न राबविता संपूर्ण निधी गट ब वर खर्च करण्यात आला आहे. तरी याबाबत शासनाचे क्षमापण आवश्यक आहे.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.872/2ब, दिनांक 10/10/1996 नूसार पंचायत समितीने कोणतीही वस्तू खरेदी करण्यापूर्वी किती वस्तूची आवश्यकता आहे, याचा आढावा घेवून खरेदी करणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्रं.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड रुपरेषा लाभार्थी निवड 30 जुन पर्यंत करुन खरेदी नोव्हेंबर मध्ये करुन साहित्याचे वाटप जानेवारी पर्यंत करावयाचे आहे. शासनाच्या निर्देशानुसार योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

6) लाभार्थीचे अर्ज तपासले त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या:-

अ. विज कोटेशन घेतले असल्याचे प्रमाणित केलेले नाही.

ब. योजनेचा यापूर्वी लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवक यांनी दिले असून ते प्रमाणित नाही.

क. लाभार्थी उत्पन्नाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी ऐवजी तलाठी यांचे आहे.

ड. लाभार्थी अर्ज अपूर्ण असून साक्षांकीत केलेले नाहीत.

7) साठा नोंदवहीत डीलेव्हरी चलानची नोंद नाही. त्यामूळे वस्तूचा साठा नेमका कधी प्राप्त झाला, याची खात्री करता येत नाही. साठा नोंदवहीवर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच योजनेची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामूळे दूबार लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी 1083/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वाये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा मूळ हेतू सफल होत आहे किंवा नाही, याबाबत योग्य ती सविस्तेर पाहणी अहवाल संचिकेत नाही. त्यामूळे योजनेचा मूळ उद्देश सफल झाल्याचे पडताळणी करता आली नाही.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्रक्र -76/ पं.रा.-1, दिनांक 24/01/2014 नूसार 3 टक्के अपंग महिलासांठी योजनेचा निधी खर्च करणे आवश्यक होते. परंतू, अशी कार्यवाही केलेली नाही. सदर अनुशेष तात्काळ भरून काढण्यात यावा.

**4.625 100 टक्के अनुदानावर शिलाई मशिन खरेदीतील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती हदगांव, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती हदगाव यांनी सन 2016-2017 या वित्तीय वर्षात पंचायत समिती उपकरातून मागासवर्गीय महिलांना 100 टक्के अनुदानावर शिलाई मशिन खरेदीवर रुपये 2,99,500/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 19/03/2012 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे परंतु, अशी कार्यवाही केलेबाबतचा ठराव दिसून येत नाही.

2) शिलाई मशीन खरेदी करताना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर व लाभार्थी निवडीनंतर पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने लाभार्थी निवडीनंतर पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे. परंतु, पंचायत समिती लाभीर्थी निवड न करता पुरवठा आदेश देवून खरेदी केली आहे उपप्रमाणकाच्या मागील पानावर साठा नोंदवही पान क्रमांक 111 ची नोंद आहे. परंतु, लेखापरीक्षणात साठा नोंदवही दर्शविली नाही. त्यामुळे शिलाई मशिनची नोंद साठा नोंदवहीत घेतली किंवा नाही, याची खात्री करता आली नाही. तरी शिलाई मशिनची साठा नोंदवही दर्शवूनच अनुपालन दर्शवावे

3) पंचायत समितीने पंचायत समिती उपकरातून शिलाइ मशिनचे नग 50 खरेदी केले असून मशिन वाटपाबाबतचे प्रस्ताव लेखापरीक्षणास दर्शविले नाही. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांनाच शिलाइ मशिनचा लाभ मिळाला किंवा नाही, याची खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1968 चे नियम 83(3) साहित्य खरेदी करण्यापूर्वी साहित्याची तपासणी व योग्य दर्जा असल्याबाबतचे कार्यालय प्रमुखाने योग्यता प्रमाणपत्र संचिकेत आढळून आले नाही.

5) लाभार्थ्याने पंचायत समितीने दिलेल्या लाभाचा दुर्विनीयोग अथवा वस्तूची विक्री करु नये, म्हणून त्यांच्याकडून रुपये 100/- च्या बंधपत्रावर हमीपत्र घेतले नाही.

6) एकाच लाभार्थ्यास शासन व जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसल्याबाबतचे पडताळणी करण्यासाठी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवली नाही.

7) संचिकेत डिलीवरी चलन दिसून आले नाही. त्यामुळे साहीत्य केव्हा प्राप्त झाले, याची खात्री करता आली नाही.

**4.626 डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना अंतर्गत एक महिन्याचे आगाऊ अनुदान देय असतांना सहा महिन्याचे एकदाच आगाऊ रक्कम अंगणवाडी सेविका व समितीच्या खाते जमा करुन रक्कम रुपये 38,59,200/- निरर्थक गुंतवून ठेवने व इतर उणीवांबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती, किनवटचे सन 2016-2017 या कालावधीचे लेखापरीक्षणात गटविकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजने अंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील कुपोषित बालक यांना अंडी व केळी तसेच गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार पुरवठा करणेकरीता 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,25,71,800/- एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, किनवटचे खाती वर्ग केलेली आहे. सदर खर्चाचे विभागाने उपलब्ध केलेल्या लेख्याची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविवी-2015/प्र.क्र.78/कार्यासन-8, दिनांक 18/11/2015 नुसार अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार पुरवठा योजना अंतर्गत आदिवासी समाजाला लाभ होईल, अशी योजना कार्यान्वीत केलेली आहे. परंतु, लाभ देतांना अनुसूचित क्षेत्रातील कुपोषित बालक व आदिवासी गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांनाच लाभ दिल्याचे अंगणवाडीनिहाय लाभार्थी नोंदवही, लाभार्थी उपस्थिती अहवाल, साठा नोंदवही व आहार पुरवठा केल्याचे लाभार्थी उपस्थितीनुसार विनियोग आहार समितीद्वारे तपासणी केल्याचे अभिलेखे दर्शविले नाही. सदर अभिलेखे दर्शवुन अनुपालन सादर करावे.

2) उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना- 2 मधील (12) नुसार योजने अंतर्गत आहार घटक खरेदीसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बाल कल्याण जिल्हा परिषद यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास यांना उपलब्ध करुन दिल्यानंतर नियमितपणे एक महिन्याचे आगाऊ अनुदान प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास यांनी अंगणवाडीचे योजनेसाठीच्या स्वतंत्र सयुंक्त खात्यामध्ये जमा करतील, असे स्पष्ट केलेले आहे. कुपोषित बालकांना अंडी व केळी आहार पुरवठा करणेसाठी माहे मार्च-2017 व एक महिना आगाऊ माहे एप्रिल-2017 करीता रक्कम रुपये 19,29,600/- वितरित करणे आवश्यक असतांना नियमबाह्य एकदाच माहे मार्च-2017 ते ऑगस्ट-2017 (सहा महिन्याचे आगाऊ अनुदान) या कालावधीकरीता रक्कम रूपये 57,88,800/- वितरित करुन अनावश्यक रक्कम रुपये 38,59,200/- जादाचे वितरित करुन शासन निधी निरर्थक गुंतवून ठेवलेली आहे. शासन नियमाचे पालन न करणे, अनावश्यक जादा प्रदान करणे, लाभार्थी उपस्थितिनुसार विनियोग आहार समितिद्वारे तपासणी अहवाल सादर न करणे ही सदर बाब गंभीर असून सदर प्रकरणात गैरव्यवहार व अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत अंगणवाडी निहाय प्रशासकीय चौकशी करुन विनियोग अहवाल योजनेसाठीच्या स्वतंत्र सयुंक्त खात्यामध्ये जमा लाभार्थी उपस्थितिनुसार विनियोग आहार समितिद्वारे तपासणी केल्याचे अहवालासह अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविवी-2015/प्र.क्र.78/कार्यासन-8, दिनांक 18/11/2015 नुसार अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार पुरवठा दिनांक 01/12/2015 पासून देण्यात यावा, असे सूचना असतांना दिनांक 01/12/2015 ते एप्रिल 2016 या कालावधीत (5 महिने) एकवेळ चौरस आहार पुरवठा केलेले नाही. परिणामी अनुसूचित क्षेत्रातील कुपोषित बालक, गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार पुरवठा पासून वंचित ठेवलेले आहे. सदर बाब गंभीर आहे.

4) एका अंगणवाडी / मिनी अंगणवाडीकरीता ग्रामसभेमार्फत 4 सदस्यीय समिती नियुक्त केल्याचे अभिलेखे व लाभाचा कालावधी संपल्यानंतर नवीन सदस्याची निवड करणे आवश्यक आहे. याबाबत नवीन सदस्याची निवड केल्याचे अभिलेखे दर्शविणेबाबत लेखी मागणी करूनही दर्शविले नाही. याबाबत सर्व अंगणवाडीचे अभिलेखे दर्शवून अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

**4.627 90 टक्के अनुदानावर लाभार्थींना शिलाई मशीन वाटपातील अनियमितता**

**पंचायत समिती मुखेड, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 19/11/2016 अन्वये रक्कम रुपये 1,40,332/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-09, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर योजना राबविण्यासाठी विहित वेळापत्रकानुसार अंबलबजावणी विहित केलेली आहे. त्यानुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळालेनंतर व लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पूर्ण करूनच साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) प्राप्त शिलाई मशीन योग्य दर्जाचे असल्यचा चाचणी अहवाल दर्शविला नाही.

3) सदर योजनेस उपरोक्त शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत पातळीवरून प्रसिद्धी देऊन इच्छुक लाभधारकाकडून अर्ज मागवून प्राप्त अर्जातून अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या लाभार्थीची निवड करून निवड यादीस पंचायत समितीची मान्यता घेऊन लाभ देणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यपद्धती न अवलंबिता जसे जसे अर्ज प्राप्त होतील व पंचायत समिती सदस्यांचे शिफारसीनुसार जसे जसे लाभार्थी प्रस्ताव प्राप्त होतील, तसे तसे साहित्य वाटप केल्याचे दिसून येते.

4) दरपत्रके मागवून कमी दराचे मेट्रो ट्रेडिंग कंपनी याचे कमी दराचे दरपत्रक स्वीकृत करण्यात आले. तथापि, पुरवठा आदेश लेखापरीक्षणास दर्शविण्यात आला नाही. तसेच साठा नोंदवही नमुना नंबर 33 ही लेखापरीक्षणास दर्शविले नसल्यामुळे माल विहित मुदतीत व आदेशानुसार प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

5) लाभार्थ्याने पंचायत समितीने दिलेल्या लाभाचा दुर्विनियोग अथवा विक्री करू नये, म्हणून त्यांचेकडून रुपये 100/- च्या बंधपत्रावर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु, पंचायत समितीने अशी उचित कार्यवाही केलेली नाही. पूर्तता दर्शवावी.

6) एकाच लाभार्थ्यास शासन जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसलेबाबतचे पडताळणी करण्यासाठी लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवलेली नाही. पूर्तता दर्शवावी.

7) योजना अंमलबजावणी नंतर लाभार्त्याकडून उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच सक्षम प्राधिकारी यांचा योजनेबाबतचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही.

**4.628 पंचायत समिती उपकर अंतर्गत 100 टक्के अनुदानावर शिलाई मशिन खरेदीतील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती हिमायतनगर, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, हिमायतनगरचे सन 2016-2017 या कालावधीचे लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकर अंतर्गत अनुसूचित जाती / जमाती दुर्बल घटकातील लाभार्थ्यांसाठी शिलाई मशिन खरेदीवर प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 06/12/2016 अन्वये रक्कम रुपये 2,68,800/- नियमबाह्य खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.444/ वित्त-9, दिनांक 19/03/2012 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु, उक्त नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

2) पंचायत समिती उपकरातून योजना राबवितांना योजनेचे प्रारूप तयार करून लाभार्थी निवड पद्धती अटी / शर्ती निश्चित करणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने प्रारूप व लाभार्थी निवड पद्धती निश्चित न करताच योजना राबविली आहे. जे की शासन नियमाचे विसंगत आहे. परिणामी अपात्र लाभार्थीची निवड करून ज्या दुर्बल घटकासाठी योजना राबविली, त्यांना लाभ मिळाला नाही. त्यामुळे पंचायत समिती उपकर निधीचे मूळ उद्देश सफल झाल्याचे दिसून येत नाही.

3) पंचायत समिती उपकर अंतर्गत शिलाई मशिन खरेदी संचिका व लेखापरीक्षणास उपलब्ध केलेल्या लाभार्थी अर्जाची व वाटपाची तपासणी केली असता अर्जासोबत 41 लाभार्थीचे जातीचे प्रमाणपत्र नाही. त्यामुळे अनुसूचित जाती / जमातीचे (SC) लाभार्थ्यांनाच लाभ दिल्याचे खातरजमा करता आली नाही. तसेच अपात्र लाभार्थींना लाभ देवून पंचायत समिती उपकर निधीचा अपव्यय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत जात प्रमाणपत्र दर्शवून खात्री पटवावी अन्यथा अपात्र लाभार्थांची रक्कम वसूल करून पंचायत समिती उपकर खाते भरणा करून अनुपालन दर्शवावे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (1) नुसार गुणवत्ता चाचणीबाबत शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. तथापि, नियम 83 (3) प्रमाणे प्रत्यक्ष खरेदी केलेल्या शिलाई मशिन योग्य गुणवत्तेची असलेबाबत प्रमाणपत्र नोंदविले नाही.

5) पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही ठेवण्यात न आल्याने दुबार लाभ दिल्याबाबत बोध होत नाही. तसेच साहित्य वापर केलेबाबत उपयोगीता प्रमाणपत्र निर्गमित केले नाही.

6) पंचायत समिती स्तरावर साठा नोंदवह्यांवर साहित्य जमा व वाटपाच्याबाबत गटविकास अधिकारी यांच्या प्रमाणित स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 नुसार गटविकास अधिकारी यांनी दर सहा महिन्यांनी साठ्याची तपासणी करणे आवश्यक आहे. अशी तपासणी केली नाही.

**4.629 50 टक्के अनुदानावर 5 एचपी पाणबुडी विद्युतपंप संच पुरवठा करणेतील अनियमितताबाबत**

**पंचायत समिती तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, तुळजापूर सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकर अंतर्गत 50 टक्के अनुदानावर 5 एचपी पाणबुडी विद्युतपंप संच पुरवठा करणे या योजनेवर रक्कम रुपये 23,10,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 83(3) नुसार गट विकास अधिकारी यांनी गुणवत्ता व योग्यतेचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

2) जिल्हा परिषदेचे विविध विभागाकडूनही अशाच प्रकारची योजना राबविण्यात येत असतांना पुन्हा त्याच प्रकारची योजना पंचायत समिती उपकरातुन राबविण्यात आल्यामुळे नवीन योजनांवर खर्च करणेबाबत कोणत्याही स्वरुपात प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून आलेले नाही.

3) लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणेपुर्वी त्यांचे अर्ज गट विकास अधिकारी यांनी मंजुर केलेले नाही. तसेच त्यांचे निवडीस पंचायत समिती सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात आलेली नाही

4) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रमांचे मुल्यमापन तीन स्तरावर करण्यात यावे परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी लाभार्थीला लाभ दिल्यानंतर चाचणी तपासणी केलेली नाही. त्यामुळे सदर योजना राबविल्यानंतर लाभार्थ्यांचा काय फायदा झाला, याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच सदर योजना यापुर्वी देखील राबविण्यात आली होती. त्याचा अनुभव काय होता व त्याचा लाभार्थ्यांना त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याची दृष्टीने कितपत फायदा झाला, याबाबत पंचायत समितीने कोणतीच कार्यवाही केली नाही.

5) एकूण 110 लाभार्थ्यांपैकी फक्त 26 लाभार्थ्यांचे 7/12 मध्ये विधंन विहीर / विहीर असल्याचे नोंद आहे. उर्वरीत लाभार्थ्यांचे 7/12 मध्ये विंधन विहीर / विहीरीची नोंद नसतांना 5 एचपी पाणबुडी विद्युतपंप संच वाटप केल्याचे निदर्शणास आले.

6) श्रीमती चंदाबाई रामा राठोड, जळकोवाडी यांचा प्रस्ताव व आवश्यक असलेली कोणतीच कागदपत्रे नसतांना साहीत्य वाटप केलेले आहे. प्रस्ताव नसतांना अनूचीत लाभाची रक्कम रूपये 10,500/- वसुल होणे आवश्यक आहे.

7) श्री. आप्पाराव भगवान लोखंडे, रा. जवळगा (मे), व श्री रामदास किसन राठोड रा. धनगावाडी यांचे प्रस्तावा सोबत 7/12 जोडलेला नाही. संबंधीताचे मालकीच्या जागेत विंधन विहीर / विहीरीची नोंद असल्याची 7/12 वरुन खातरजमा न करताच साहित्य वाटप केलेले आहे. 7/12 नसतांना अनूचीत लाभाची रक्कम रूपये 21,000/- वसुल होणे आवश्यक आहे.

**4.630 50 टक्के अनुदानावर 5 एचपी पाणबुडी विद्युतपंप संच पुरवठा करणेतील अनियमितताबाबत**

**पंचायत समिती कळंब, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, कळंबचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकर अंतर्गत 50 टक्के अनुदानावर

5 एचपी पाणबुडी विद्युतपंप संच पुरवठा करणे या योजनेवर प्रमाणक क्रमांक 3, दिनांक 09/03/2017 अन्वये रक्कम रुपये 4,93,500/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तुची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पुर्ण करुन वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल, अशा प्रकारे योजना राबवावयाची आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 83(3) नुसार गट विकास अधिकारी, यांनी गुणवत्ता व योग्यतेचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

3) जिल्हा परिषदेचे विविध विभागाकडूनही अशाच प्रकारची योजना राबविण्यात येत असतांना पुन्हा त्याच प्रकारची योजना पंचायत समिती उपकरातुन राबविण्यात आल्यामुळे नविन योजनांवर खर्च करणेबाबत कोणत्याही स्वरुपात प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून आलेले नाही.

4) लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणेपुर्वी त्यांचे अर्ज गट विकास अधिकारी यांनी मंजुर केलेले नाही. तसेच त्यांचे निवडीस पंचायत समिती सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

5) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रमांचे मुल्यमापन तीन स्तरावर करण्यात यावे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी लाभार्थीला लाभ दिल्यानंतर चाचणी तपासणी केलेली नाही. त्यामुळे सदर योजना राबविल्यानंतर लाभार्थ्यांचा काय फायदा झाला, याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच सदर योजना यापुर्वी देखील राबविण्यात आली होती. त्याचा अनुभव काय होता व त्याचा लाभार्थ्यांना त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याची दृष्टीने कितपत फायदा झाला, याबाबत पंचायत समितीने कोणतीच कार्यवाही केली नाही.

6) वेळोवेळी जाहिर केलेल्या लाभार्थी आरक्षणाचे पालन झाले नाही.

7) अट क्रमांक 20 नुसार विद्युत जोडणी असणाऱ्याचीच निवड करणे बंधनकारक असताना 6 लाभार्थ्यांच्या नावे विद्युत जोडणी आढळली नाही.

**4.631 10 टक्के रक्कम महिला व बाल विकास कार्यक्रमावर खर्च न केलेबाबत.**

**पंचायत समिती भूम, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती, भूमचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकर अंदाजपत्रकामध्ये महिला व बाल विकास कार्यक्रमावर 10 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 49,769/- ची तरतूद केली आहे. परंतु, सदरील रक्कम खर्च केला नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-17/ 2001/प्र.क्र.206 /05, दिनांक 06/11/2001 अन्वये महिला व बालविकास विषयक धोरण जाहीर केले असून त्यानुसार पंचायत समितीने आपल्या स्वउत्पन्नातून किमान 10 टक्के इतकी रक्कम महिला व बाल विकास कार्यक्रमावर खर्च केली पाहिजे, अशा सुचना आहेत.

2) पंचायत समिती, भूमचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकराचे अंदाजपत्रकाची तपासणी केली असता त्यामध्ये महिला व बालविकास कार्यक्रमावर 10 टक्के प्रमाणे एकुण रक्कम रुपये 49,769/- एवढी तरतूद केलेली आहे.

3) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे कलम 06 अन्वये अर्धसमास पत्र क्रमांक 18, दिनांक 21/08/2017 अन्वये मागणी केल्यानंतर व पंचायत समितीने लेखापरीक्षणास सादर केलेल्या माहितीनुसार 10 टक्के प्रमाणे महिला व बालविकास कार्यक्रमावर तरतूद केलेले रुपये 49,769/- खर्च केलेले नाहीत.

4) पंचायत समिती, भूम यांनी 10 टक्के प्रमाणे महिला व बालविकास कार्यक्रमावर तरतूद केलेली रक्कम खर्च न केल्यामुळे ग्रामीण भागातील महिला व बालके शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेले आहेत. सदर

योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील लाभार्थ्यांच्या जीवनामध्ये सामाजीक व आर्थिक सुधारणा होण्यास मदत झालेली नाही.

5) पंचायत समिती, भूम यांनी सन 2016-2017 या वित्तीय वर्षा मागील शिल्लक असलेला अनुशेष व चालू वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात तरतूद केलेला निधी रक्कम रुपये 49,769/- महिला व विकास कार्यक्रमावर एकत्रितरित्या खर्च करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

**4.632 अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेत केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती लोहारा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती, लोहाराने सन 2016-2017 मध्ये अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेवर रक्कम रुपये 7,65,432/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा यांनी रकाना क्रमांक 5 मध्ये नमुद केल्यानुसार तांत्रिक मान्यता दिलेली असुन ग्रामपंचायत बेंडकाळ, कास्ती खु. व खेड येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक हे GSDA दरसुची 2013-2014 नुसार तयार करण्यात आले, तर मुर्शदपुर व भोसगा येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक हे GSDA दरसुची 2015-2016 नुसार तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे नळ पाणी पुरवठा योजनेतील बोअरवेल, पंपीग मशिनरी, राइजिंग मेन व आर.सी.सी. सिस्टर्न कम स्टॅंड पोस्ट कामाच्या बाबीतील दरामध्ये तफावत दिसुन येते. सदरील नळ योजनेची कामे ही 2016-2017 या वर्षात करण्यात येत असल्याने नळ पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक हे GSDA दरसुची 2015-2016 नुसारच तयार करुन त्यास तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असतांना ग्रामपंचायत बेंडकाळ, कास्ती खु. व खेड येथील नळ पाणीपुरवठा योजनेचे अंदाजपत्रक हे GSDA दरसुची 2013-2014 नुसार तयार करण्यात आले असल्याने व सदरील दर अधिक असल्याने सदर कामातील बाबीमध्ये जादा रकमेचे प्रदान झाले आहे. बेंडकाळ, कास्ती खु व खेड येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक हे GSDA दरसुची 2015-2016 नुसार तयार करुन तेथील कामाचे बाबीतील दराची परिगणना करुन जादा प्रदान तफावतीची रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा दर्शवावी.

2) अतिरिक्त् मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वर नमुद प्रशासकीय मान्यतेतील अट क्रमांक 25 नुसार गट विकास अधिकाऱ्याने कामे सुरु करण्यापुर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घ्यावीत काम पुर्ण झाल्यानंतर त्या परिसराची पुन्हा छायाचित्रे घ्यावीत व त्याच्या प्रती जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे पाठवावित. त्यानुसार गट विकास अधिकाऱ्याने वर नमुद कामे सुरु करण्यापुर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेतलेली नाहीत. तथापि, काम पुर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कम्माच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे संगणकीकृत नामफलक बसविलेली छायाचित्रे घेतली आहेत.

3) ग्रामपंचायत खेड, कास्ती खु. व बेंडकाळ येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या वरील छायाचित्रांचे अवलोकन केले असता प्रत्यक्ष कामाची जागा व तेथील परिसर एकच असुन केवळ एकाच संगणकीकृत नामफलकावर खाडाखोड / उपरिलेखन करुन वेगवेगळी छायाचित्रे काढण्यात आल्याने सदरील तीनही कामाची तपासणी होणे आवश्यक आहे. एकाच कामावर वेगवेगळी संगणकीकृत नामफलके बसवुन व त्याची बनावट छायाचित्रे काढुन प्रत्यक्ष काम न करता रक्कम प्रदान केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत वरील तीनही कामाची प्रशासकीय व तांत्रिक तपासणी करुन संबंधितावर जबाबदारी निश्चित करावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.-44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे तथापि, जिल्हा परिषदेने एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 197 नुसार नमुना 69 मध्ये पूर्ण केलेल्या बांधकामाची नोंदवही ठेवणे व त्यातील संपूर्ण रकाने भरणे आवश्यक आहे तथापि, अशी नोंदवही ठेवून पूर्ण केलेल्या कामाच्या नोंदी घेण्यात आलेली नाहीत.

**4.633 ICDS-02 ने खाजगी वाहनावर नियमबाह्य खर्च केलेबाबत.**

**पंचायत समिती निलंगा, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 26) -** पंचायत समिती, निलंगा चे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करताना अंतर्गत कार्यालय ICDS-02 च्या अभिलेख्याची तपासणी केली असता वाहन क्रमांक MH-24-AP-1542 वर रक्कम रूपये 30,194/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रमाणे नमूद प्रमाणकान्वये दर्शविण्यात आलेला खर्च हा CDPO पदाचा अतिरीक्त पदभार असणारे श्री. एम.एम. कुलकर्णी (A-BDO) यांच्या मालकीच्या असणाऱ्या वाहनावरच केल्याचे लेखापरीक्षणात कागदपत्रावरून (R.C. BOOK, INSURANCE) निदर्शनास आले. MH-24-AP-1542 हे वाहन कार्यालयास संबंधित अधिकारी यांनी दिनांक 30/01/2017 ते 28/02/2017 या कालावधीत भाड्याने लावून वापरले. परंतु, सदर वाहन भाड्याने कार्यालयास लावण्यापूर्वी वाहन वापरासाठीची वरिष्ठ कार्यालयाच्या मंजुरीचे पत्र मागणी करूनही संबंधीताने लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं-82/भाग-111 / उद्योग-4, दिनांक 01/12/2016 मधील क्रमांक 09 नुसार दरपत्रके मागवून वाहनाचा वापर करणे बंधकारक असताना अशी कार्यपद्धती न अवलंबिल्यामुळे तुलनात्मक दराचा फायदा झालेला नाही सदर साहित्य दरपत्रके मोहोरबंद लिफाफा पद्धतीने न मागविता हातोहात एकाच व्यक्तीचे दरपत्रके मागविल्याचे दिसून येते. सदर संचिकेत संबंधित अधिकारी यांच्याच वाहनाचे कागदपत्रे पहावयास मिळाली. यावरून स्पष्ट होते की, संबंधित अधिकारी यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून शासन अनुदान लाटण्यासाठी स्वतःची गाडी कार्यालयास भाड्याने दर्शवून रक्कम आहरीत केली आहे. तरी सदर वाहनावर खर्च करण्यात आलेली रक्कम रुपये 30,194/- संबंधीताकडून वसूल करावी व शासन निधीत भरणा करून अनुपालन सादर करावे.

3) MH-24-AP-1542 हे वाहन कार्यालयास संबंधित अधिकारी यांनी दिनांक 30/01/2017 ते 28/02/2017 या कालावधी नंतरही भाड्याने पुढील कालावधीसाठी वापरल्याचे कागदपत्रावरून निदर्शनास आले. यावरून सदर क्रमांकाचे वाहन वापरल्याचे पुढील कालावधीचे देयक प्रदान न करणेबाबत दक्षता घ्यावी.